SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333 –BOS- 2609094
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2609000, अभ्यास मंडळे विभाग 2609094
फॅक्स : 0091 - 0231 -2691533 व 2692333. e-mail : bos@unishivaji.ac.in
Estd. 1962
NAAC 'A' Grade

शि. वि. / अ.मं / 544 दि.15 / 01 / 2018

**प्रति,**

मा. प्राचार्य / संचालक / समन्वयक / अधिविभागप्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था / संबंधित अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय –** सर्व विद्याशाखेअंतर्गत भाग – 1 पदवी अभ्यासक्रमांमध्ये **'लोकशाही, निवडणूक व सुशासन'** हया सक्तीच्या विषयाचा अभ्यासक्रमाचा समावेश केल्याबाबत.

**संदर्भ –** इकडील पत्र क्र. शिवाजी वि. / अ.मं / 3069 दि. 14 / 07 / 2017

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2017–18 पासून सर्व विद्याशाखेअंतर्गत **'लोकशाही, निवडणूक व सुशासन'** हा विषय सक्तीचा केला असून सदर विषयाचे मराठी माध्यमातील स्वयं अध्ययन साहित्य व ध्वनीफिती विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in (Online syllabus)** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

तेंव्हा उपरोक्त बाब सर्व संबंधित विद्यार्थी व शिक्षकांच्या निदर्शनास आणावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव

G:\011.01.2018 Good Gover.doc

Estd : 1962

NAAC ‘A’ Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८ पासून

## प्रथम वर्ष पदवी परिक्षेच्या सर्व विद्याशाखांसाठी आवश्यक

## ‘‘लोकशाही, निवडणूका आणि सुशासन’’

संपादक

प्रा. डॉ. भारती पाटील,

प्र. अधिष्ठाता, मानव्यशास्त्र

# अनुक्रमणिका


| अ.क्र | प्रकरण | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | उद्‌देश्य | १ |
| २ | लोकशाही | २-१९ |
| ३ | निवडणूका | २०-५८ |
| ४ | सुशासन | ५९-६९ |
| ५ | विद्यार्थ्यांनी करावयाच्या अभ्यासात्मक कृती | ७० |
| ६ | नमुना प्रश्न | ७१-७९ |



**लेखक** : प्रा. डॉ. रविंद्र भणगे — प्रकरण १

श्री. आनंदा कांबळे — प्रकरण २

डॉ. अमिता कणेगांवकर — प्रकरण ३

# उद्देश

लोकशाहीचे महत्व काय आहे यासंबंधीची जाणीव जागृती विद्यार्थ्यामध्ये करणे हा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. घटनात्मक लोकशाही म्हणजे काय, व्यक्तीच्या जीवनात लोकशाहीचे महत्व काय आहे आणि जर व्यक्तीने समाजामध्ये चांगली भूमिका बजावली तर तिला त्यामुळे काय फायदा मिळू शकेल हे समजून घेणे या अभ्यासाचा उद्देश आहे. याशिवाय या अभ्यासाचा आणखी एक उदेश हा आहे की व्यक्तीला लोकशाहीच्या वेगवेगळया पैलूंची माहिती करून देणे आणि राज्याच्या सर्वांगीण विकासामध्ये तिची भूमिका काय आहे हे समजावून सांगणे. हा अभ्यासक्रम अशा दृष्टीकोनातून सुरू करण्यात आला आहे की महाविद्यालयामध्ये प्रवेशित झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी आपली मतदार म्हणून नोंदणी करावी आणि समाजातील इतर लोकांना यासाठी प्रोत्साहित करावे तसेच विद्यार्थ्यांनी केवळ मतदार म्हणून सहभागी न होता सर्वसाधारण निवडणूक व राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभागी व्हावे.

# लोकशाही

..........................................................................................................

**प्रस्तावना ः**

लोकशाहीची संकल्पना राजकीय सिद्धांताच्या केंद्रस्थानी असलेली संकल्पना आहे. लोकशाहीची संकल्पना दोन हजार वर्षापूर्वीपासून अस्तित्वात आहे. प्राचिन ग्रीक राजकीय विचारांमध्ये लोकशाहीचा उल्लेख सापडतो. लोकशाही संकल्पनेच्या विकासामध्ये प्राचीन रोमन साम्राज्याचे योगदान मोठे आहे. प्रसिद्ध ग्रीक विचारवंत प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्या लिखानामधून लोकशाहीचे उल्लेख सापडतात. प्लेटोच्या मते 'लोकशाही म्हणजे शासित लोकांचे राज्य'लोकशाही संकल्पनेत एकाच वेळी राजकीय, सामाजिक तत्वप्रणाली, संस्थाव्यवस्था, व्यवहार, लोकांची मनोवृत्ती इत्यादी विविध गोष्टीमध्ये आढळून येतात. आज लोकशाही जगात सर्वात लोकप्रिय अशी राजकीय संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय समूदायातील अर्ध्याहून अधिक राष्ट्रांनी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. राज्यशास्त्राच्या शब्दकोशात लोकशाही हा शब्द जरी हजारो वर्षापासून असला तरी त्याचा खऱ्या अर्थाने वापर विसाव्या शतकात सुरू झाला. या शतकात स्वतंत्र झालेल्या बहूसंख्य राष्ट्रांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा अंगीकार केला. या शतकातच अनेक देशांचा प्रवास हा लोकशाहीकडे झालेला दिसून येतो. विसाव्या शतकातील दोन महायुद्धे ही लोकशाही मुल्यांच्या संरक्षणासाठी लढली गेली. पहिले महायुद्ध वसाहतवाद विरूद्ध लोकशाही मुल्ये अशा स्वरूपाचे होते. दोन्ही महायुद्धामध्ये लोकशाही मुल्यांचाच विजय झाला.

लोकशाही हे लोकसंमतीने चालणारे शासन आहे. आधुनिक काळात ही संमती सार्वत्रिक व प्रौढ मतदान हक्कानुसार होणाऱ्या निवडणूकीच्या मार्गाने होते. मतदानाचा विस्तृत होत गेलेला हक्क लोकशाहीचा पाया विस्तृत करत असतो. छोटया ग्रीक नगरराज्यात प्रचलीत असलेली प्रत्यक्ष लोकशाही हे लोकसहभागाचे प्रत्यक्षीकरण होते. आजच्या काळातील लोकशाहीमध्ये लोकांचा सहभाग स्थिर व व्यापक राहण्यासाठी समाजपातळीवर मुल्यांबाबत सहमती, सामाजिक व्यवहाराबाबत, नियमांबाबत सहमती आणि विविध सामाजिक निर्णयाबाबत सहमती यांची आवश्यकता असते. बहूमताने अल्पमताचे म्हणने ऐकून घेण्याची आणि त्यांतील योग्य मताचे सहमतीमध्ये रूपांतर करण्याची तयारी आणि सहमती आवश्यक असेल तर मतविरोधाची सर्व मान्य पध्दती यावर लोकशाहीचे यश अवलंबून असते. बहुमतांचे शासन आणि अल्पमतांचे हक्क यांत समतोल साधणे यामुळे लोकशाही गतिमान राहते. राजकीय दृष्टीने संमती, सहमती व सहकार्य यावर लोकशाही शासनाचा भर असला तरी शासन चालविण्यापेक्षा त्यांच्या दिशेला लोकानुवर्ती व प्रातिनिधिक वळण देणे त्यामागे अभिप्रेत आहे. समाज जीवनातील विशिष्ट मुल्ये आणि आचरण पद्धती जाणीवपूर्वक जपण्याचा आग्रह लोकशाही व्यवस्थेत धरला जातो.

**लोकशाहीचा अर्थ ः**

लोकशाही हा शासनाचा अत्यंत प्राचिन प्रकार आहे.प्राचिन ग्रीक नगर राज्यातील प्रत्यक्ष लोकशाहीच्या जागी राष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर प्रतिनिधिक लोकशाही पद्धत सुरू झाली आणि आजच्या काळात जवळ जवळ अर्ध्या जगाचे शासन प्रतिनिधिक लोकशाहीच्या तत्वानुसार चालत असलेले दिसून येते.प्राचीन ग्रीक विचारवंत प्लेटो पासून ते आजपर्यंत राज्यशास्त्रामध्ये लोकशाही हा मध्यवर्ती विषय राहिलेला आहे.लोकशाहीला इंग्रजीमध्ये 'डेमोक्रसी'[Democracy]असे म्हणतात.त्याची उत्पत्ती 'डेमॉस'[Demos(लोक)] आणि 'केटॉस'[Kratos(सत्ता)] या शब्दांपासून झाली.त्यांचा अर्थ लोक आणि सत्ता असा होतो म्हणून डेमॉक्रसी म्हणजे लोकांचे राज्य. लोकसत्ता किंवा लोकशाही बहूसंख्य लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही असा अर्थ ही घेतला जातो. अब्राहम लिंकन यांनी 'लोकशाहीची लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य' अशी व्याख्या केली आहे.लोकशाही हा केवळ शासन प्रकार नाही तो एक जीवनमार्ग आहे लोकशाही ही एक नैतिक संकल्पना आहे.ग्रीक नगरराज्यामध्ये शासनाचे सर्व निर्णय नगरातील सर्व नागरिकांची सभा बोलवून प्रत्यक्ष मतदानातून घेतले जात असत म्हणून तेथील लोकशाहीला प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणत.पुढील काळात इंग्लंडच्या जनतेने राजाकडून नागरी हक्कांची सनद इ. स.१२१५ ला मिळवली, तिला मॅग्ना चार्टा असे ही म्हणतात.आधुनिक लोकशाहीचा तो पहिला टप्पा मानला जातो.१३ अमेरिकन वसाहतींनी ब्रिटिश सत्ता झुगारून देऊन लोकशाही स्वरूपाचे संविधान स्वीकारले.फ्रेंन्च जनतेने तेथील अनियंत्रित राजेशाही सरंजामदार आणि बुरसटलेली धर्मसत्ता यांच्या विरूद्ध बंड पुकारले आणि फ्रांन्सची राज्यक्रांती घडून आली.त्यानंतरही खरी लोकशाही मिळविण्यासाठी तेथील जनतेला पुढील १00 वर्ष संघर्ष करावा लागला.औदयोगिक क्रांतीमूळे लोकशाहीच्या जडणघडणीस पाश्चात्य देशामध्ये मोठी चालना मिळाली. नवनवे वैज्ञानिक शोध लागले,यंत्रे निर्माण झाली, मोठे कारखाने निघून त्यात हजारो कामगारांना रोजगार मिळाला,उत्पादनात वाढ झाली,शेती व्यवसाय दुय्यम ठरला त्यामुळे कामगार वर्गात जागृती झाली.आपल्या हक्काची जाणीव झाली. शिक्षणातून नवमुल्यांचे संस्कार घेतलेले लोक हक्कासाठी लढू लागले.कालांतराने त्यांना यश मिळाले, मताधिकार मिळाला त्याचा विस्तार झाला आणि लोकशाही अस्तित्वात आली.संपूर्ण जगामध्ये लोकशाहीचा मुल्यविचार व आदर्श स्विकारले जाऊ लागले.लोकशाही म्हणजे केवळ राजकीय व्यवस्था नाही तर ती जीवनाकडे पाहण्याची वृत्ती, दृष्टिकोण आहे. व्यक्तीच्या सर्व जीवनात आणि संवंधात लोकशाही मुल्ये प्रभावीपणे व्यक्त होणे खऱ्या लोकशाहीला अपेक्षित आहे.

**लोकशाहीची व्याख्या ः**

१) लॉर्ड ब्राइस ः - राज्याची सत्ता समाजातील सर्व लोकांच्या हाती सामूदायिक स्वरूपात देण्यात आलेला शासन प्रकार म्हणजे लोकशाही होय .

२) अब्राहम लिंकन ः - लोकशाही म्हणजे लोकांचे¸लोकांसाठी आणि लोकांकडून चालविले गेलेले शासन होय.

३) सिली ः - लोकशाही हा प्रत्येकाचा सहभाग असणारा शासन प्रकार आहे.

४) मॅकफर्सन ः - लोकशाही म्हणजे शासन निवडण्याचा आणि त्याद्वारे कायदे बनविण्याचा राजकीय निर्णय घेण्याचा प्रकार आहे.

५) लिपसेट ः - लोकशाही म्हणजे अशी राजकीय व्यवस्था की ज्यामध्ये लोकांना आपले शासनकर्ते बदलण्याची नियमित घटनात्मक संधी मिळते.आणि अशी सामाजिक व्यवस्था की ज्यामध्ये बहूसंख्य लोकांना निवडणूकीच्या माध्यमातून महत्वपूर्ण धोरणांना , निर्णयांना प्रभावित करण्याची संधी मिळते.

६) सरतोरी ः - लोकशाही शासनव्यवस्था म्हणजे अशी शासन व्यवस्था की जी शासनकर्त्यांना जबाबदेयी आणि उत्तरदायी बनविते. या व्यवस्थेची परिणामकारकता राजकीय नेतृत्वाच्या कौशल्य गुणांवर आधारलेली असते.

७) हेरोडोटस ः - ज्या समाजात समान हक्क असतात व जेथे राज्यकर्ते आपल्या कृत्यांना जबाबदार असतात तो समाज म्हणजे लोकशाही समाज होय.

८) जॉन स्टूअर्ट मिल ः - लोकशाही ही शासन प्रणालीचा असा प्रकार आहे की ज्यात सर्व लोक किंवा त्यांच्यापैकी त्यांनीच निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मार्फत शासकीय सत्तेचा वापर करतात.

९) रिओ खिश्चनसन ः - लोकशाहीत नागरिक स्वतः होऊन त्यांच्या वरील शासनाला मान्यता देतात व राज्य कारभारात बहूसंख्येने सहभागी होतात.

१०) डॉ.बाबासाहेब आंबेडकर ः- लोकशाही हा असा शासन प्रकार आहे की ज्यात सामाजिक व आर्थिक परिवर्तन होता शांततामय व कायदेशीर मार्गाने होते ती व्यवस्था म्हणजे लोकशाही होय.

- **लोकशाहीचे विविध पैलू ः**

विसाव्या शतकात लोकशाहीच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अशा पैलूंचा विकास झाला. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक ही लोकशाहीची विविध रूपे आहेत.

**१) राजकीय लोकशाही ः**

लोकशाहीमध्ये राजकीय लोकशाही हा शासनाचा प्रकार आहे. या प्रकारामध्ये लोक स्वतः प्रत्यक्षरित्या किंवा प्रतिनिधीद्वारे शासन सत्तेचा उपयोग करतात. राजकीय लोकशाहीमध्ये प्रौढ नागरिकाला भाषा, जात, धर्म, वंश, संपत्ती, सामाजिक दर्जा, प्रदेश या आधारावर कोणताही भेदभाव न करता मतदानाचा समान अधिकार दिला आहे.प्रौढ नागरिकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जात नाही. राजकीय लोकशाहीमध्ये निवडणूकीत उभे राहण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. वैधानिक मार्गाने शासन बदलण्याचा अधिकार लोकांना असतो.राजकीय पक्षाची निर्मिती , मताधिकार राजकीय लोकशाहीचा मुख्य उद्देश आहे.कांही देशात राजकीय लोकशाहीचा अभाव दिसून येतो. साम्यवादी देशात आर्थिक लोकशाहीवर भर दिला जातो.त्यामूळे राजकीय लोकशाही मर्यादित होते अशा देशात इतर राजकीय पक्ष निर्माण करण्याचे स्वातंत्र्य नसते.तसेच शासनाचे धोरण आणि कार्याबद्दल विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नसते.

### २) <u>सामाजिक लोकशाही</u> ः

स्वातंत्र्य , समता आणि बंधुता या तत्वावर सामाजिक लोकशाही मधील समाजव्यवस्था आधारलेली असावी. जाती, धर्म, वंश, भाषा, श्रेष्ठ, कनिष्ठ, गरीब, श्रीमंत अशा प्रकारचा भेदभाव नसावा. प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेला महत्व असावे असे अपेक्षीत असते.काही क्षेत्रामध्ये राजकीय लोकशाही प्रस्थापित होते पण सामाजिक लोकशाहीचा अभाव दिसून येतो. उदा. अमेरीकेत राजकीय लोकशाही उच्च प्रतिची आहे पण अजूनही तेथील कृष्णवर्णीय सामाजिक जीवनात सन्मानाचे आणि इतरांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त झालेले नाही. तसेच भारतात देखील राजकीय लोकशाही आहे, पण व्यवहारात सामाजिक लोकशाही अजूनपर्यंत रूजलेली नाही ही वास्तविकता नाकारता येत नाही.कांही देशात सामाजिक लोकशाही आहे तर काही देशात राजकीय लोकशाही नाही म्हणून सामाजिक आणि राजकीय लोकशाही परस्पर पूरक आहे. यासाठी दोन्हीचे अस्तित्व असणे आवश्यक आहे.

### ३) <u>आर्थिक लोकशाही</u> ः

आर्थिक लोकशाही हा राजकीय लोकशाहीचा पाया आहे. लोकशाही समाजवादात राजकीय आणि आर्थिक लोकशाहीला सारखेच महत्व देण्यात येते. राजकीय लोकशाही प्रस्थापित झाल्यानंतर आर्थिक लोकशाहीच्या स्थापनेवर भर दिला जातो. प्रत्येकाला अर्थाजन करण्याची आणि आपला स्वत:चा विकास करण्याची समान संधी प्राप्त होणे म्हणजे आर्थिक लोकशाही होय.समाजवादी विचारवंतांच्या मते,उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची असावीत. भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादनाची साधने काही व्यक्तींच्या हातात केंद्रीत झाल्यामूळे जनतेचे शोषण होते. त्यामूळे लोकांना आपला आर्थिक विकास करण्याची संधी प्राप्त होत नाही.अशा परिस्थितीत राजकीय लोकशाही अर्थहीन ठरते. आर्थिक लोकशाही जो पर्यत प्रस्थापित होत नाही तो पर्यत राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने प्रस्थापित होऊ शकत नाही.

## लोकशाहीचे प्रकार ः

### १) प्रत्यक्ष लोकशाही ः–

लोकशाहीच्या कारभारात लोकांचा सहभाग कोणत्या रीतीने होतो यावरून लोकशाहीचे प्रत्यक्ष लोकशाही व अप्रत्यक्ष लोकशाही असे प्रकार आपण पाडत आलो आहोत.प्रत्यक्ष लोकशाहीचे आदर्श स्वरूप ग्रीक नगरराज्यांमध्येच अस्तित्वात होते. त्या नगरराज्यांचा कारभार करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी त्या त्या नगरातील सर्व नागरिक एकत्र होत असत आणि निर्णय घेत असत.प्रत्यक्ष लोकशाही ही स्विझर्लंड देशातच काही प्रमाणात आढळते.तिथल्या नागरिकांना कायदयाचा मसुदा मांडण्याबाबत पुढाकार घेता येतो, आपल्या प्रतिनिधींना परत बोलावण्याचा हक्क असतो आणि तिथले राज्यकर्ते काही प्रस्ताव निर्णय घेण्यापूर्वी नागरिकांच्या सार्वमताला टाकू शकतात. एवढयाच संदर्भात तिथे प्रत्यक्ष लोकशाहीचे अवशेष आहेत असे म्हणायला जागा आहे.वार्षिक मेळाव्यात नागरिकांनी एकत्र येऊन राजकीय निर्णय घेण्याची प्रथा स्विझर्लंड मधील सव्वीस पैकी फक्त पाच घटकराज्यात आढळते.

## २) अप्रत्यक्ष लोकशाही / प्रातिनिधीक लोकशाही ः

अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाहीतील नागरिक निवडणूकीव्द्वारे आपले प्रतिनिधी निवडतात आणि ते प्रतिनिधी लोकांच्यावतीने राज्यकारभार करतात. प्रातिनिधीक लोकशाहीचे अध्यक्षीय व संसदीय असे दोन प्रकार आढळतात. त्यातील पहिल्या प्रकारात म्हणजेच अध्यक्षीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ एकमेकांपासून स्वतंत्र असतात. अशाप्रकारची व्यवस्था अमेरिकेत आढळते तर दुसऱ्या प्रकारच्या म्हणजेच संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ विधिमंडळात उत्तरदायी असते आणि त्याचा विश्वास असे पर्य ंतच सत्तेवर राहू शकते. ही व्यवस्था भारत आणि इंग्लंड या देशात आढळते. नागरिक सार्वत्रिक निवडणूकांच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडतात. हे प्रतिनिधी नागरिकांच्या वतीने शासन कारभार चालवितात ते जनतेला उत्तरदायी आणि जबाबदार असतात. या प्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णयांना ठरविलेल्या धोरणांना जनतेची अधिमान्यता असते. जनतेला निवडणूकींच्या माध्यमातून शासनकर्त्यांना बदलण्याचा अधिकार असतो. थोडक्यात प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये जनता जरी प्रत्यक्ष शासन कारभारात सहभागी होत नसली तरी सत्तेची खरी सुत्रे जनतेच्या हातात असतात.

**लोकशाहीची तत्वे ः**

**लोकशाही ही एक जीवनप्रणाली असून ती काही तत्त्वांवर आधारित असते. ती तत्त्वे पुढील प्रमाणे**

### १) लोकांचे राज्य

लोकांचे राज्य म्हणजेच लोकांकडून चालवले जाणारे शासन होय. लोकशाहीमधील अंतिम सत्ता सार्वभौमत्व हे लोकांचे असते. राजकीय दृष्टीने तीच अखेरची सत्ता असते. लोक स्वतंत्र होणे आणि ते सक्षम होणे हे उदारमतवादी लोकशाहीचे ध्येय आहे. आधूनिक काळात अप्रत्यक्ष लोकशाही ही प्रौढ मतदानाच्या हक्कामधून मान्य झालेली आहे. सार्वत्रिक, खूल्या व नियमित निवडणूकांतून लोकांची सत्ता व्यक्त होते आणि राजकीय सत्तेला अधिमान्यता मिळते.

### २) बहूमताचे शासन ः

राजकीय व्यवहार सुरळीत चालण्यासाठी व राजकीय स्थित्यंतर शांततामय पद्धतीने होण्यासाठी बहूमताचे शासन हा लोकशाहीतील महत्वाचा नियम आहे. निवडणूकीच्या पद्धतीत प्रचलित असलेल्या प्रत्येक प्रकाराचे काही फायदे व मर्यादा आहेत. मतदानाचा अधिकार पवित्र आणि जबाबदारीचा अधिकार मानला गेलेला आहे. तथापि तो सर्वजण बजावतीलच असे नाही आणि त्याबाबत सक्ती करण्याबाबतही दुमत आढळते. प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पद्धती, व्यावसायिक, दुबार मतदान इ. अनेक पध्दतीचा वापर होत असला तरी प्रौढ सार्वत्रिक मतदान सर्वसामान्यतः वापरण्यात येते. अशा पध्दतीत संघटित अल्पमत बहुसंख्येने निवडुन येणाऱ्यांना बहुमताचा आधार असेलच असे नाही. बहुमताने घेतलेला निर्णय सर्वांना मान्य करावा लागतो

### ३) व्यक्ती विकासाला प्राधान्य ः

जनतेच्या सार्वभौमत्वाचा पुरस्कार करताना व्यक्तीचा विकास घडवून आणणे आणि त्यासाठी राज्याने अनूकूल, बाह्य परिस्थिती निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य मानलेले आहे. उदारमतवादी विचारांत व्यक्तीहित

आणि समाजहित यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. व्यक्तिवादी सिद्धांत राज्याच्या कोणत्याही हस्तक्षेपाला विरोध करतो इतकी टोकाची भूमिका लोकशाही सिद्धांत घेत नाही. आधूनिक राज्यघटनेत व्यक्तीच्या मूलभूत हक्कांची नोंद करण्याची प्रथा आहे. व्यक्तीस्वातंत्र्याचा, व्यक्तीविकासाच्या मूलभूत हक्कांची नोंद आणि त्यांच्या रक्षणाची खास सोय राज्यघटनेत केलेली आढळते.

**४) व्यक्तीविकासासाठी व्यक्तीस्वातंत्र्याचा आग्रह ः**

व्यक्तीविकासासाठी राज्याने केवळ अनूकूल बाह्य परिस्थिती निर्माण करून न थांबता त्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत आणि समाजहितासाठी त्यावर काही बंधने आणावी लागली तर ती कमीत कमी व सामाजिक उपयुक्ततेच्या मर्यादेतच असली पाहिजेत. जे. एस. मिलने व्यक्तीचे स्वसंबंध आणि समाजसंबंध असे दोन भाग पाडलेले असून स्वसंबंधी क्षेत्रात त्याला संपूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे असे म्हटले आहे.

**५) लोकांचा सहभाग ः**

लोकशाहीमध्ये लोकांचा सहभाग वाढावा म्हणून शासन प्रक्रिया अधिकाधिक सहभागी करण्याकडे अधीक कल दिसून येतो.शासकीय निर्णयप्रक्रियेत व अंमलबजावणीत लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी लोकांच्या निर्णयाचे क्षेत्र वाढविले जाते. विकेंद्रिकरणातून हे शक्य होते. तसेच शासनाच्या रचनेत विभागणी नियंत्रणाचा वापर करून समतोल निर्माण केला जातो. जनतेचा सहभाग, प्रशासन प्रक्रिया जिल्हा व खालील स्तरापर्यंत पंचायती राज्यव्यवस्थेने नेऊन वाढविलेला आहे.

**६) शासकीय व्यवस्थेचे विकेंद्रिकरण ः**

विकेंद्रिकरण लोकशाही शासन व्यवस्था स्थिर करण्यात महत्वाची कामगिरी बजावते. विकेंद्रिकरणाचा फायदा केवळ प्रशासकीय क्षेत्रापूरता मर्यादित न राहता राजकीय दृष्टया ही व्यवस्थेला मान्यता देण्याच्या दृष्टिने महत्वाचा ठरतो.केंद्रिकरणाचे तोटे त्यामूळे कमी होऊन राजकीय व्यवस्था लोकांना जवळची वाटू लागते. लॉकने लोकांची संमती विधिमंडळाचे सार्वभौमत्व आणि बहूमताचे प्रतिनिधिक शासन या कल्पनांचा पुरस्कार केला. मॉटेस्क्यूने सत्ताविभाजनाची कल्पना लोकशाहीच्या संदर्भात पूढे आणली.

**७) शासन जनतेला जबाबदार ः**

संसदीय व अध्यक्षीय पध्दती हे प्रातिनिधिक शासनाचेच भिन्न भिन्न प्रकार आहेत. या निरनिराळया प्रकारामूळे राज्याच्या व्यवस्थेत व शासनप्रणालीत जरी फरक असला तरी दोन्ही व्यवस्थेत शासन जनतेला जबाबदार असते आणि जनतेच्या प्रतिनिधिंच्याव्द्वारे आणि त्यांच्या नियंत्रणानुसार शासनाचे कार्य होते.

**लोकशाहीची वैशिष्टये ः**

**१) <u>अंतिम निर्णय घेण्याची सत्ता जनतेकडे</u> ः**

लोकशाही व्यवस्थेचे हे सर्वात महत्वाचे वैशिष्टय आहे.अमेरीकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, Democracy is the rule of the people for the people & by the people. याचा अर्थ जनतेला केंद्रस्थानी ठेऊन कार्य करणारी ही व्यवस्था

आहे. राज्यातील सर्वोच्यसत्ता ही जनतेच्या हातात असलेमूळे अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा जनतेकडेच असतो. लोकशाही जनता ही आपल्या प्रतिनिधिच्या माध्यमातून शासन चालवत आहे. हे प्रतिनिधी जनतेकडून निवडले गेले असल्यामूळे त्यांनी घेतलेले निर्णय हे जनतेचे निर्णय असतात.

२) **<u>मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूका</u>** ः

मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूका हे लोकशाहीचे दुसरे महत्वाचे वैशिष्टय आहे. मुक्त आणि सार्व त्रिक निवडणूकांशिवाय  लोकशाहीचे अस्तित्व शक्य नाही. या निवडणूकांद्वारे जनता आपले प्रतिनिधी शासन कारभारासाठी निवडते. लोकसंख्या वाढल्यामूळे प्रत्यक्ष लोकशाही आज शक्य नाही. प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिक शासन कारभारात सहभाग घेतो पण ते आज शक्य नाही. परिणामी जनता अप्रत्यक्षपणे आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून शासन चालविते. हा अप्रत्यक्ष लोकशाहीचा प्रकार लोकशाहीमध्ये केवळ निवडणूका असून पुरेसे नाही. जनतेपुढे विविध राजकीय पर्याय उपलब्ध असणे गरजेचे आहे. जनता या पर्यायामधून निवडणूकीच्या माध्यमातून आपल्या पसंतीचा पर्याय निवडते. निवडणूकांमुळे जनतेला केवळ आपले प्रतिनिधी निवडण्याचीच संधी मिळत नाही तर अस्तित्वात असलेले शासन बदलण्याची संधीही मिळते.

३) **<u>सार्वत्रिक प्रौढ मताधिकार</u>** ः

गेल्या दोन दशकात लोकशाहीसाठी चाललेला संघर्ष प्रामुख्याने सार्वत्रिक प्रौढ मताधिकारासाठीचा संघर्ष आहे.कोणत्याही भेदभावाशिवाय राज्यातील प्रत्येक प्रौढ नागरिकाला एक मत मिळायलाच हवे (One man-One vote) आणि त्या एका मतालाही मुल्य असायला हवे हे लोकशाहीचे वैशिष्टय आहे.विसाव्या शतकाच्या पूर्वाधापर्यंत मतदानाचा अधिकार हा समाजातील विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित होता. महिलांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले होते परंतु आता जगातील सर्वच राष्ट्रांनी महिलांनाही मतदानाचा अधिकार दिला आहे. भारतात वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या भारतीय नागरिकाला कोणत्याही भेदभावाशिवाय, पूर्व अटीशिवाय मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे.

४) **<u>व्यापक राजकीय सहभाग</u>** ः

लोकशाहीमध्ये जनतेचा राजकीय सहभाग हा व्यापक स्वरूपाचा असतो हा राजकीय सहभाग विशिष्ट अंतराने होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकांमधून प्रतिविंबीत होतो.प्रौढ मताधिकारांमूळे सर्वच नागरिक राजकीय प्रक्रियेत सहभागी होत असतात.नागरिकांच्या व्यापक राजकीय सहभागावरच लोकशाहीची यशस्विता अवलंबून असते.विकसीत राष्ट्रात नागरिकांचा सहभाग मोठया प्रमाणात असतो.त्या प्रमाणात अविकसीत राष्ट्रांत सहभाग हा अल्प असतो.

५) **<u>सत्तेचे विकेंद्रीकरण</u>** ः

लोकशाही शासनात सत्तेचे विकेंद्रीकरण महत्वाचे असते.लोकशाहीत कोणत्याही घटकाकडून सत्तेचा गैरवापर होऊ नये यासाठी सत्ता विभाजन आवश्यक असते.कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ, यांच्यात अधिकारांची विभागणी केलेली असते.तव्दतच केंद्रीय पातळीपासूनच ते ग्रामपातळीपर्यंत सत्तेच्या

अधिकाराचे विकेंद्रीकरण करून सर्वसामान्य नागरिकांनाही राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी दिली जाते.

६) **स्पर्धात्मकता** ः

स्पर्धात्मकता हे लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्टय आहे. विविध राजकीय पक्ष सत्ताप्राप्तीसाठी निवडणूकांच्या रिंगणात असतात.निवडणूकाच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करण्यासाठी त्यांच्यात चढाओढ असते या बहूलतेमुळे नागरिकांनाही पर्याय उपलब्ध होतात. भारतात बहूपक्ष पद्धतीमूळे ही स्पर्धात्मकता वाढली आहे.

७) **घटनात्मक कायदा आणि जनअधिकारांना केंद्रस्थान** ः

लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे घटनात्मक कायदा आणि जनअधिकारांना असलेले केंद्रस्थान.निवडणूकीद्वारे निवडून आलेल्या प्रत्येक शासनाला घटनात्मक कायदयाच्या चौकटीत राज्यकारभार करावा लागतो. घटनात्मक कायदा हा राज्यातील सर्वोच्य कायदा असून तो सर्वांसाठी समान असतो. घटनात्मक कायदयाने जनतेला काही नागरी आणि राजकीय अधिकार बहाल केलेले असतात. या अधिकारांचे रक्षण करणे शासनाचे कर्तव्य आहे. शासनाकडून या अधिकारांचे उल्लंघन झाल्यास व्यक्तीला न्यायपालिकेकडे दाद मागण्याचा अधिकार आहे. हे अधिकार लोकशाहीतील राजकीय सहभाग वाढविण्यासाठी महत्वाचे आहेत.

**लोकशाहीचे गुण** ः लोकशाही हा शासनव्यवस्थेचा सर्वोत्तम प्रकार असुन त्याचे गुण पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) **समता, स्वातंत्र्य व बंधूता या तत्वांना पोषक** ः

लोकशाही हा एकमेव शासन प्रकार असा आहे की जिथे प्रत्येक व्यक्तीला आपले स्वतःचे असे मोल असते आणि प्रत्येक व्यक्तीच्या अंगी विकासाच्या अमर्याद सुप्त शक्यता दडलेल्या असतात असे गृहित धरले जाते. प्रत्येकाला स्वतःच्या सुप्त गुणांचा व मानवी व्यक्तीमत्वाचा जास्तीत जास्त विकास करण्याची संधी पूरविली जाते. लोकशाही राज्यव्यवस्थेत सर्वांना समान वर्तणूक मिळते.समान हक्क व स्वातंत्र्ये दिली जातात आणि सर्वांचे परस्परांशी असलेले संबंध बंधुभावाचे राहतील असे प्रयत्न केले जातात.

२) <u>सर्वांच्या हितसंबंधांचे संरक्षण</u> ः

लोकशाहीमध्ये समाजातील सर्व लोकांच्या हितसंबंधांचे संरक्षण होते.लोकशाहीत सर्व जनतेचे प्रतिनिधित्व करणारे शासन असल्यामूळे जनतेचे प्रश्न शासनाला माहित असतात आणि ते सोडविण्यासाठी प्रयत्न केला जातो.

३) <u>कल्याणकारी भूमिका</u> ः

आधूनिक काळात लोकशाही शासन व्यवस्थांनी कल्याणकारी भूमिका स्वीकारली असून या शासन व्यवस्था सामाजिक प्रगतीसाठी वचनबद्ध आहेत.जनतेचे अधिकाअधिक कल्याण करणे हे या शासनाचे उद्दिष्ट असते त्यानूसार विकास योजना राबविल्या जातात.

४) <u>लोकमताला प्राधान्य</u> ः

लोकशाही ही लोकमत किंवा जनमताला प्राधान्य देणारी शासन पद्धती आहे.लोकशाहीत शासन हे लोकमताचे प्रतिनिधित्व करणारे असते.कोणताही निर्णय घेताना किंवा धोरण ठरविताना लोकमताचा विचार केला जातो.राज्यकर्त्यांवर लोकमताचा सातत्याने दबाव असतो.

५) <u>विकेंद्रीकरण</u> ः

लोकशाही शासन व्यवस्था ही विकेंद्रीकरणाच्या तत्वावर आधारलेली आहे. या पद्धतीत सत्ता ही विविध पातळयांवर आणि विविध घटकांमध्ये विभागली जाते.सत्ता विभागणीमूळे परस्पर समतोल आणि नियंत्रण साधले जाते.कोणताही निर्णय परस्पर विचार चर्चेतून घेतला जातो. लोकशाही विकेंद्रीकरणामूळे निर्णय निर्मिती प्रक्रियेत अधिकाअधिक लोकांना समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न होतो.

६) <u>जनशक्ती श्रेष्ठ</u> ः

लोकशाहीत सत्तेची अंतिम सुत्रे ही जनतेच्या हातात असतात. जनता आपले प्रतिनिधी निवडून देते हे प्रतिनिधी आपल्या कार्यासाठी जनतेला जबाबदार असतात. या पद्धतीत शासन निरंकुश बनण्याचा किंवा एकाधिकारशाही पणे वागण्याचा प्रश्न उद्भवत नाही. राज्यकर्त्यांमध्ये जबाबदारीची जाणीव असते.

७) <u>राजकीय प्रशिक्षण</u> ः

लोकशाही ही जनतेला राजकीय प्रशिक्षण देणारी त्यांना स्वयंशासनाची कला शिकविणारी प्रयोगशाळा आहे. या पद्धतीत सर्व जनतेला राजकीय प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

८) <u>शांतता , सुरक्षिततेला प्राधान्य</u> ः

लोकशाही शासन व्यवस्था शांतता आणि सुरक्षिततेच्या तत्वांना प्राधान्य देणारी आहे. या पद्धतीत सत्तांतराची प्रकियादेखील शांततेच्या आणि घटनात्मक पद्धतीने होते. जनता निवडणूकांच्या माध्यमातून आपल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करत सत्तांतर घडवून आणते. शांतता आणि सुरक्षितता व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी उपकारक ठरते.

**<u>लोकशाही राज्यव्यवस्थांचे नवे वर्गीकरण ः</u>**

आज जगात प्रचलित असलेल्या लोकशाही राज्यव्यवस्थांच्या प्रत्यक्ष कामकाजाचा आणि लोकशाही विषयक सिद्धांताचा आधार घेऊन लोकशाहींचे सहा प्रकारात वर्गीकरण करण्याचा एक प्रयत्न रॉक फेलर विद्यापिठातील प्राध्यापक ॲमी गहमन यांनी केला आहे.ते वर्गीकरण अधिक वस्तुनिष्ठ वाटते ते पुढील प्रमाणे.

**१) कार्यप्रणालीसीमीत लोकशाही ः (प्रोसीजरल डेमॉक्रसी)**

शुम्पीटरने केलेली लोकशाहीची व्याख्या अशी आहे की, राजकीय निर्णयांप्रत पोहचण्याची ती एक संस्थात्मक व्यवस्था असते ,त्या व्यवस्थेत व्यक्तींनी लोकांच्या मतांचा स्पर्धात्मक लढयात विजयी होऊन निर्णय सत्ता स्वतःकडे घेतलेली असते.ती फक्त एक पद्धती या दृष्टिने लोकशाहीचा विचार करतो.लोकमताचा पाठिंबा मिळविण्यासाठी केलेला स्पर्धात्मक संघर्ष व त्यातून मिळवलेली अंतिम निर्णय सत्ता हाच लोकशाहीचा खरा आशय आहे असे त्याला वाटते. कॅपिटॅलिझम, सोशॅलिझम ॲंड डेमॉक्रसी या ग्रंथात पुढील पाच वैशिष्टयांचा त्याने उल्लेख केला आहे.राजकारणी माणसांची पर्याप्त गुणवत्ता, राजकीय निर्णयांचे मर्यादित क्षेत्र, प्रभावी व कार्यक्षम नोकरशाही , लोकशाही आत्मसंयमन आणि मतभेदांप्रती सहिष्णूता यांचा उल्लेख केला आहे.

**२) लोकानुयायी लोकशाही ः (पॉप्यूलिस्ट डेमॉक्रसी)**

लोकानुयायी लोकशाहीचा अर्थ लोकांनी स्वतःच मुक्त , समान व स्वतंत्र व्यक्ती या दृष्टीने स्वतःवर राज्य करणे असा होतो.कोणत्याही बाह्य सत्तेने किंवा एखादया स्वयंनिर्वाचित गटाने राज्य करणे लोकानुयायी लोकशाहीशी विसंगत असते. राज्यकारभारासाठी जी शासन यंत्रणा आवश्यक ठरेल ती अस्तित्वात असावी.पण त्या यंत्रणेवर काही स्पष्ट मर्यादा घातलेल्या असणे अत्यावश्यक असते.राजसत्तेने घेतलेले निणर्य लोक इच्छेशी सुसंगत असावेत. त्या खेरीज लोकशाही निर्णयांमधून लोकांची इच्छा प्रतिबिंबित होण्याचा दुसरा मार्गच नाही असे लोकानुयायी लोकशाहीचे पुरस्कर्ते मानतात.

**३) उदारमतवादी लोकशाही ः ( लिबरल डेमॉक्रसी)**

उदारमतवादी लोकशाहीचे पुरस्कर्ते शासनाच्या लोकनिर्वाचिततेपेक्षा नागरिकांना मुक्त व समान व्यक्ती या नात्याने मिळणाऱ्या पायाभूत स्वातंत्र्यांना अधिक महत्व देतात. विचाराचे स्वातंत्र , अविष्काराचे स्वातंत्र , संघटन स्वातंत्र , धर्म स्वातंत्र , खाजगी मालमत्ता बाळगण्याचे स्वातंत्र , मतदानाचा अधिकार , अटकेपासून व बंदिवासापासून व्यक्तीला संरक्षण आणि कायदयाचे अधिराज्य या गोष्टींवर उदारमतवादाचा कटाक्ष असतो. लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सत्ता केंद्रांना अमर्याद सत्ता मिळून नागरिकांची स्वातंत्र्ये संकटात सापडू नयेत या दृष्टिने न्यायालयीन पूर्नविलोकन, नियंत्रण व संतुलनाची तरतुद, सत्ताविभाजनाचे तत्व यासारखी नियंत्रणे अंमलात असण्यावरही भर देताना दिसतात.

**४) सहभागी लोकशाही : (पार्टिसिपेटरी डेमॉकसी)**

सहभागी लोकशाहीच्या समर्थकांच्या मते व्यक्ती स्वातंत्र्याला संरक्षण मिळवण्यापेक्षा लोकांना राजकारणात सहभागी होण्याची संधी जास्त प्रमाणात मिळणे अधिक महत्वाचे असते. खरी लोकशाही नागरिकांच्या कृतिशिल सहभागातूनच साकार होत असते. समकालीन लोकशाही राज्यव्यवस्था त्यांच्या नागरीकांना प्रत्यक्ष लोकशाहीच्या तुलनेत सहभागाच्या फारच कमी संधी उपलब्ध करून देत असलेमूळे लोकांना राजकीय सहभागाचे मोल कळेनासे झाले आहे. आज मतदार वर्ग अनभिज्ञ व उदासीन असतो, मतदानाचे प्रमाण सगळीकडेच कमी होत चालले आहे, राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे प्रमाण भरमसाठ वाढले आहे आणि सार्वजनिक पदे धारण करणाऱ्यांमध्ये बेजबाबदारपणा खूप वाढला आहे. सहभागी लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांच्या मते या सर्व गोष्टींसाठी आजच्या प्रातिनिधीक लोकशाहीचे स्वरूपच कारणीभूत आहे. लोकांचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टिने आधूनिक प्रसार माध्यमे मोलाची भूमिका पार पाडू शकतात असे त्यांना वाटते.

**५) सामाजिक लोकशाही : (सोशल डेमॉकसी)**

पारंपारिक उदारमतवादाने काही गोष्टींना खाजगी ठरवून लोकशाही तत्वांच्या चर्चेपासून दूरच ठेवले होते. उदा. आर्थिक क्षेत्र, कुटूंबसंख्या किंवा भारतासारख्या देशातील जातिसंस्था याचा उहापोह त्या विचाराच्या प्रवर्तकांना लोकशाहीच्या संदर्भात करावासा वाटला नव्हता. खरे पाहता परंपरेने खाजगी मानल्या गेलेल्या या गोष्टींचा लोकशाहीवर, नागरिकांच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर आणि राजकीय समतेवर विविध प्रकारांनी परिणाम पडतो ही वस्तुस्थिती आहे व्यक्तींच्या जीवनांवर जूलमी सत्तेचे वर्चस्व प्रस्थापित होऊ नये असे वाटत असेल तर सत्तेवर कायदेशीर निर्बंध घालण्यापेक्षा किंवा केवळ लोकांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण वाढण्यापेक्षा सामाजिक लोकशाहीचा प्रसार करणे हाच त्यांच्या मते हमखास उपाय ठरू शकतो.

**६) विचारशील लोकशाही : (डेलिबरेटिव डेमॉक्रसी)**

विचारशील लोकशाहीचे अशी भुमिका असते की लोक एकमेकांशी जोडले जातात ते विचारपूर्वक युक्तिवाद करून, पूरावे सादर करून, मूल्यमापन मांडून आणि अनुनय करून एकमेकांना प्रभावित करूनच जोडले जात असतात. लोकांची मने वळवणाऱ्या युक्तिवादांच्याव्द्ारे या प्रकारच्या लोकशाहीतील राजकारणी सामूहिक राजकारणाला आकार देत असतात.मन वळवणी हा विचारशील लोकशाहीच्या दृष्टीने राजकीय सत्तेचा सर्वात समर्थनीय प्रकार असतो कारण तोच प्रकार व्यक्तींची स्वायत्तता, त्याची स्वयंशासनाची क्षमता यांच्याशी सर्वाधिक सुसंगत असतो.राज्यातील सार्वजनिक उत्तरदायित्वाची जबाबदारी ज्या संस्थांवर असते त्यांना लोकजीवन प्रभावित करणाऱ्या सार्वजनिक मुदयांवर चर्चा करण्यात प्रोत्साहित करावे असा आग्रह विचारशील लोकशाहीचे समर्थक धरतात.

**लोकशाही समोरील आव्हाने :**

उदारमतवादी लोकशाही संकल्पनेने औद्योगिक व विकसित अशा समाजात राजकीय व आर्थिक स्थैर्य निर्माण केलेले आहे. त्यामूळे विकसनशील व नवोदित देशांतही लोकशाही पद्धतीविषयी आकर्षण निर्माण झालेले आहे.आंतरराष्ट्रीय समाजात स्थान आणि प्रतिष्ठा मिळण्याच्या दृष्टिने सामान्य लोकांबरोबर नवोदित राज्यांनाही लोकशाहीचे महत्व वाटू लागलेले आहे.

**१) <u>लोकांमधील जागरूकतेचा अभाव</u> :**

लोकशाहीच्या यशासाठी सामान्य जनता सतत जागरूक असणे आवश्यक आहे. अखंड जागरूकता ही लोकशाहीसाठी किंमती आहे. प्रतिनिधीक लोकशाहीमध्ये लोक-प्रतिनिधींवर सतत लक्ष ठेवूनच त्यांना लोकमताच्या मार्गावर ठेवता येते. जागरूक लोकच असे नियंत्रण ठेऊ शकतील. तेच जर निष्क्रिय व बेफिकीर राहिले तर सत्तेची साधने जवळ असल्याने लोकप्रतिनिधी आपल्या हिताचेच रक्षण करतील हा लोकशाही व्यवस्थेपुढील महत्वाचा प्रश्न आहे.मतदानाचा हक्क हे लोकांच्या हातात असलेले हत्यार आहे.त्याचा लोकांनी जागरूकपणे वापर करण्यावरच लोकशाहीचे यश अवलंबून आहे.लोकांनाच लोकशाही विषयी आस्था नसेल किंवा ईर्षा नसेल तर लोकशाहीला भविष्य राहणार नाही.

**२) <u>लोकसहभागाच्या मर्यादा</u> :**

लोकसहभागावर लोकशाहीचा जीवंतपणा अवलंबून असतो. लोकसहभाग वाढविण्यासाठी समाजात सर्व क्षेत्रात समानता असणे आवश्यक आहे. समाज रचनेत समतल रचना असल्यास सामाजिक, आर्थिक

आणि राजकीय प्रक्रियांचे क्षेत्र वाढू शकते आणि त्यांचा लोकांवर अधिक प्रभाव पडत असल्याने लोकांची लोकशाहीविषयी आस्था अधिक वाढेल.

- **लोकशाहीच्या यशस्वितेसाठीच्या बाबी** ः

लोकशाही हा सर्वोत्तम शासन प्रकार असला तरी त्या आदर्श स्वरूपात आज तो जगात कुठेही अस्तित्वात आहे असे म्हणता येणार नाही.त्या आदर्शाकडे जाण्याचा प्रयत्न प्रत्येक लोकशाही देश आपापल्या परीने करतो असेच फार झाल्यास आपण म्हणू शकतो की लोकशाही यशस्वी होण्यासाठी ज्या काही पूर्वशर्ती असतात त्या विशिष्ट देशात किती प्रमाणात पूर्ण होतात यावर तो देश लोकशाहीच्या आदर्शा च्या किती जवळ जाऊ शकतो हे अवलंबून असते.

१) **आर्थिक व सामाजिक विषमता वाजवीपेक्षा जास्त नसावी** ः

समाजातील गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी जर खूप असेल तर सामाजिकदृष्टया खालच्या स्तरावरील व गरीब लोकांना राजकीय हक्क निर्भयपणे वापरता येणार नाहीत. श्रीमंत वर्ग आपल्या अर्थीक सत्तेच्या जोरावर राजकीय समानता पूर्णपणे निरर्थक बनवतील. तेव्हा लोकशाहीच्या यशस्वितेसाठी सर्वात पहिली आवश्यक गोष्ट असते ती म्हणजे समाजात सामाजिक व आर्थिक विषमता एवढी असू नये ज्यामुळे कनिष्ठ वर्गीयांना श्रीमंत वर्गाच्या मर्जीवर विसंबून रहावे लागेल.

२) **शिक्षणाच्या सोयी पुरेशा प्रमाणात असाव्यात** ः

समाजात शिक्षणाचे प्रमाण किती आहे यावर लोकशाहीचे यश अवलंबून आहे.प्राथमिक, माध्यमिक, उच्च अशा सर्वच पातळयांवर समाजव्यापी व कार्यक्षम शिक्षणव्यवस्था ज्या देशात नसेल तिथल्या लोकशाहीचे भवितव्य संकटात आल्यावाचून राहणार नाही. लोकशिक्षण हा लोकशाहीसाठी महत्वाचा भाग असतो त्यासाठी आवश्यक असलेली माध्यमे अस्तित्वात असणेही गरजेचे आहे.

३) **विवेकपूर्ण लोकमत अस्तित्वात असावे** ः

लोकशाही हे लोकमतानुसार चालणारे राज्य असते त्यामूळे शासनाला मार्गदर्शन करू शकेल अशा स्पष्ट व सुसंगत स्वरूपात समाजातील लोकमताचा कल सतत व्यक्त होत रहाणे गरजेचे असते.समाजात जो पर्यंत विषमता आहे तो पर्यंत तेथे लोकशाही शासन अस्तित्वात येण्याची शक्यता फारच थोडी असते.

४) **<u>लोकांचे संघटन व नेतृत्व</u>** ः

लोकशाही यशस्वी होण्यासाठी लोकांचे योग्य प्रकारे संघटन असावे व त्यांना चांगले नेतृत्व लाभावे. समान हितसंबंधांच्या आधारे लोक एकत्र येतात त्यातून दबावगट व राजकीय पक्षांचा उदय होतो. संघटनाच्या कार्याला दिशा लाभणे व त्यात सातत्य राखले जाणे आवश्यक असते. ते बहूतांश त्यांना लाभणाऱ्या नेतृत्वावर अवलंबून असते. बुद्धिमान, प्रामाणिक, निस्वार्थी नेते जनतेला योग्य मार्गदर्शन करू शकतात. संघटनेला शिस्त लावू शकतात. निर्णयकर्त्यापर्यंत जनतेचे म्हणणे प्रभावी पणे पोहचवू शकतात.

५) **<u>लोकांचा लोकशाहीवर विश्वास असावा</u>** ः

लोकशाहीच्या तत्वावर आणि कार्यपद्धतींवर लोकांचा विश्वास नसेल तर किरकोळ निमित्तानेही ते असनदशीर व बेकायदा मार्गाकडे वळण्यास प्रवृत्त होतील हे स्पष्ट आहे. लोक वारंवार अशा मार्गाचा अवलंब करू लागले की राज्यकर्त्यांना दमनाचा मार्ग जवळ करायचे कारण मिळते आणि देशातील लोकशाहीचा अस्त जवळ आल्याचेच हे लक्षण असते.

म्हणूनच भारतातील सुजाण नागरिकांनी लोकशाहीवर दृढ विश्वास ठेवून, ती यशस्वी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्यासाठी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभागी झाले पाहिजे कारण निवडणूकीच्या माध्यमातूनच भारतात लोकशाही राबविली जात आहे. त्यामुळेच आता आपण निवडणूकांसंबंधी सविस्तर माहिती करुन घेऊ.

# निवडणूका

.....................................................................................................

आधुनिक काळातील राष्ट्र —राज्य ही व्यवस्था भौगोलिक आकारमान व लोकसंख्या या दृष्टिने फार मोठी आहेत. यातील लोकशाही शासनप्रणाली स्विकारणाऱ्या राष्ट्रांनी अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीचा स्विकार केला आहे. अशा अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाही स्विकारलेल्या भारतात खऱ्या अर्थाने लोकशाही रूजवायची असेल, तर निवडणूका खुल्या व स्वच्छ वातावरणात नियमितपणे होणे गरजेचे आहे.कारण या निवडणूकीच्या माध्यमातूनच राज्यकर्ते सत्तेवर येतात.भारतीय जनतेला विस्तीर्ण संघराज्य शासनपद्धतीच्या राज्यकारभारात सामील करून घेण्यासाठी भारतीय राज्यघटनेने राष्ट्रीय पातळीवर—केंद्रसरकार, घटकराज्य पातळीवर — राज्यसरकार आणि स्थानिक पातळीवर—ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करून, जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीं मार्फत या संस्थांचा राज्यकारभार चालविण्यास मान्यता दिली आहे.

लोकशाही तत्वाप्रमाणे जनतेची सत्ता ही सर्वश्रेष्ठ सत्ता असते.जनतेच्या इच्छेप्रमाणे राज्यकारभार चालावा अशी लोकशाहीत अपेक्षा असते.पण प्रातिनिधिक लोकशाहीत शासनाची सत्ता जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधिंच्या हाती असते.त्यामूळे प्रातिनिधिक लोकशाहीत निवडणूकांना फार महत्व आहे. म्हणूनच निवडणूका खुल्या व स्वच्छ वातावरणात झाल्यास शासनात जनतेचे खरेखुरे प्रतिबिंब उमटते.तसेच निडणूकीमुळे राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाल्याने, जनतेच्या राजकीय जाणीवा प्रगल्भ होतात. यासाठी भारतीय राज्यघटनेने वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व प्रौढ भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार दिला आहे. मालमत्ता, शिक्षण, लिंग, धर्म, जात,

वंश अशा कोणत्याही कारणावरून भेदभाव न करता सर्व भारतीय नागरिकांना प्रौढमताधिकार दिला आहे. लोकशाही राज्यव्यवस्थांच्यामध्ये निवडणूकीच्या माध्यमातून, 'शांततेच्या मार्गाने सत्ता परिवर्तन' हा राज्यव्यवस्थेचा आधार मानला जातो, त्यामुळे अशा लोकशाही राज्यव्यवस्थेत निष्पक्ष व खुल्या निवडणूका होणे व नियमित निवडणूकामधून शांततेच्या मार्गाने सत्ता परिवर्तन होणे अपेक्षित आहे.

निवडणूकीच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत जनतेला राजकीय प्रकियेत सहभागी होण्याची व आपली मते व्यक्त करण्याची संधी मिळते. अशा निवडणूकीच्या माध्यमातून होणारा सत्ताबदल कोणत्याही रक्तपाताशिवाय घडून येतो. निवडणूकीतून निवडून आलेली सरकारे लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात परिवर्तन, विकास घडविण्याचा प्रयत्न करतात, कारण त्यांना नियमीतपणे निवडणूकीला सामोरे जावे लागते.

या सर्व बाबी योग्यरित्या साध्य कारावयाच्या असतील तर निवडणूका नियमीतपणे व राज्यघटनेने तयार केलेल्या संहितेनुसार पार पाडणे आवश्यक आहे.यासाठी भारतीय राज्यघटनेने कलम ३२४ नुसार 'निवडणूक आयोग' या स्वायत्त संस्थेकडे निवडणूकीबाबत देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रणाचे अधिकार सोपविले आहेत. १५ व्या विभागातील कलम ३२४ ते ३२८ मध्ये निवडणूक आयोगाबाबत तरतूदी करण्यात आल्या आहेत.

## निवडणूक आयोगाची रचना

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ (२) नुसार निवडणूक आयोगाचा एक मुख्य निवडणूक आयुक्त असेल व राष्ट्रपतींना आवश्यकता वाटल्यास राष्ट्रपती इतर निवडणूक आयुक्तांची संख्या निश्चित करतील.

भारतीय राज्यघटनेच्या अमंलबजावणीपासून १५ ऑक्टोंबर १९८९ पर्यंत निवडणूक आयोग हा एक सदस्यीय होता. १९८८ सालच्या ६१ व्या राज्यघटना दुरूस्तीने मतदाराचे वय २१ वरून १८ वर्षे करण्यात आले, त्यामुळे वाढलेल्या कामाचा ताण विचारात घेऊन, राष्ट्रपतींनी १६ ऑक्टोंबर १९८९ रोजी अन्य दोन निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केली. तेव्हापासून भारतीय निवडणूक आयोग बहुसदस्यीय बनला. पण २ जानेवारी १९९० ला अन्य दोन निवडणूक आयुक्तांची पदे रद्द केली गेली. त्यानंतर पुन्हा १ ऑक्टोंबर १९९३ रोजी अन्य दोन निवडणूक आयुक्तांची राष्ट्रपतींनी नियुक्ती केली. तेव्हा पासून भारतीय निवडणूक आयोग बहुसदस्यीय आहे.

## निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य

निवडणूक आयोगाचे मुख्य व अन्य निवडणूक आयुक्त यांची राष्ट्रपती नियुक्ती करतात. पण त्यांना पदच्युत करता येत नाही त्यांना पदमुक्त करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांना पदमुक्त करण्यासाठी वापरली जाणारी पध्दती वापरावी लागते. ही पध्दती अत्यंत कठीण स्वरूपाची आहे. त्यामुळे आयुक्ताच्या पदाच्या कार्यकालाची शाश्वती राहते. तसेच त्यांच्या सेवाशर्तीमध्ये त्यांना अपायकारक ठरतील असे बदल करता येत नाहीत. अशा प्रकारे निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे कार्य घटनात्मक तरतूदीद्वारेच केले आहे.

## निवडणूक आयोगाचे अधिकार व कार्ये

निवडणूक आयोगाला प्रशासकीय कार्यातील सल्लागाराची व निम- न्यायालयीन स्वरूपाची कार्ये करावी लागतात. ती पुढीलप्रमाणे

१. सर्व पात्र मतदारांची नाव नोंदणी करून, मतदार यादी तयार करणे व ती यादी नियमितपणे अद्ययावत ठेवणे.
२. निवडणूक वेळापत्रक जाहिर करणे. त्यानुसार उमेदवारी अर्ज, छाननी, माघार, निवडणूक चिन्ह वाटप इ. कार्ये करणे.
३. राजकीय पक्षांना मान्यता देणे आणि चिन्हे देणे.
४. राजकीय पक्षांची मान्यता व चिन्ह याबाबत संघर्ष निर्माण झाल्यास, न्यायालयीन कार्य करून निर्णय देणे.
५. राजकीय पक्ष, उमेदवार व प्रशासन यांच्यासाठी आचार संहिता ठरवणे व तिची अमंलबजावणी करणे.
६. संसद व राज्यविधीमंडळ सदस्यांच्या अपात्रतेबाबत अनुक्रमे राष्ट्रपती व राज्यपाल यांना सल्ला देणे.
७. मतदान केंद्र बळकावणे, हिंसा व इतर अनियीमत कारणांनी संघर्ष उद्भवल्यास मतदान रद्द करणे, निवडणूका पूढे ढकलणे, फेरमतदान घेणे इ. अधिकार निवडणूक आयोगाला असतात.

निवडणूक आयोगाकडून राष्ट्रीय व राज्यस्तरावरील निवडणूका घेतल्या जातात.

## अद्ध राष्ट्रीय स्तर

भारतीय संघराज्य व्यवस्थेत राष्ट्रीय पातळीवर केंद्रीय कायदेमंडळ , कार्यकारीमंडळ व सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती करण्यात आली आहे. केंद्रीय पातळीवरील कायदेमंडळाला 'संसद' असे

संबोधण्यात येते. भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या विभागात कलम ७१ ते १२२ मध्ये भारताच्या संसदेची तरतूद करण्यात आली आहे.भारताने राष्ट्रीय पातळीवर व्दिगृही कायदेमंडळाचा स्विकार केला असून ;१ब्ध लोकसभा ;२ब्ध राज्यसभा अशी त्याची दोन सभागृहे आहेत.

त्यातील लोकसभा हे प्रथम किंवा कनिष्ठ सभागृह असून ते प्रत्यक्ष जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीचे असते.म्हणजेच ते जनतेचे प्रतिनिधीत्व करते.तर राज्यसभा हे व्दितीय किंवा वरिष्ठ सभागृह असून ते घटकराज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे.

राष्ट्रपती संसदेच्या कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसतात.पण संसदेच्या दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकाचे कायदयात रूपांतर होण्यासाठी राष्ट्रपतीची संमती आवश्यक असते.या राष्ट्रपतीच्या कायदेविषयक अधिकारामूळे राज्यघटनेच्या कलम ७९ मध्ये असे म्हटले आहे की, भारतीय 'संघराज्यासाठी एक संसद असेल आणि राष्ट्रपती , राज्यसभा व लोकसभा मिळून ती बनलेली असेल'.भारतीय संसदेच्या या तीन घटकांची रचना व निवडणूक प्रकिया पुढीलप्रमाणे.

## १. राष्ट्रपती

भारतीय राज्यघटनेने संसदीय शासन पध्दतीचा स्विकार केला आहे. संसदीय शासन पध्दतीतील कार्यकारी मंडळाचे वैशिष्ट्ये म्हणजे यात दोन कार्यकारी प्रमुख असतात.

१. नामधारी किंवा घटनात्मक कार्यकारी प्रमुख

२. प्रत्यक्ष किंवा वास्तविक कार्यकारी प्रमुख

यामध्ये देशाचा राज्यकारभार घटनात्मक कार्यकारी प्रमुखाच्या नावाने म्हणजेच राष्ट्रपतींच्या नावाने चालतो. तर देशाची वास्तविक कार्यकारी सत्ता पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ वापरत असते.

घटनात्मक किंवा नामधारी कार्यकारी प्रमुख म्हणून राष्ट्रपती कार्यकारी मंडळाचा प्रमुख या नात्याने कार्य करतात. देशाचा सर्व राज्यकारभार राष्ट्रपतींच्या नावाने चालविला जातो.

राष्ट्रपती हे सर्वोच्च पद भारतामध्ये अप्रत्यक्ष रित्या जनतेकडून निवडले जाते. म्हणजेच अंतीम सत्ता जनतेकडे असते. अशी सर्वोच्च पदी असणारी व्यक्ती वंशपरंपरेने संत्तेवर न येता, निवडणूकीच्या माध्यमातून अप्रत्यक्षरित्या जनतेकडून त्या पदावर येत असल्याने गणराज्य व्यवस्था अस्तित्वात येते. ही व्यवस्था राज्यघटनाकारांनी भारतीय समाजातील परंपरेचे विषमतावादी तत्त्व नष्ट करण्याच्या हेतूने स्विकारली व कोणत्याही भारतीय नागरीकाला निवडणूकीच्या माध्यमातून भारताच्या राष्ट्रपती या सर्वोच्च पदावर विराजमान होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

## राष्ट्रपती पदासाठी आवश्यक पात्रता

भारतीय राज्यघटनेने राष्ट्रपती पदासाठी निश्चित केलेली पात्रता पुढीलप्रमाणे —

१. ती व्यक्ती भारताची नागरीक असली पाहिजे.
२. तिच्या वयाची ३५ वर्षे पुर्ण असली पाहिजेत.
३. ती व्यक्ती लोकसभेवर निवडून येण्यास पात्र असली पाहिजे.
४. अशी व्यक्ती भारत सरकार व राज्यसरकारे किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील कोणत्याही संस्थेमध्ये लाभाचे पद धारण करणारी नसावी.

## राष्ट्रपतीची निवडणूक

राष्ट्रपतीचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. भारताच्या राष्ट्रपतीची निवड अप्रत्यक्षरित्या जनतेकडून होते. ही निवड प्रमाणशीर प्रतिनिधींत्वाच्या एकल संक्रमणीय (Single Transferable Vote) पध्दतीनुसार केली जाते. राष्ट्रपतींच्या निवडणूकीत मतदानाचा अधिकार असणाऱ्या घटकांचे निर्वाचक मंडळ तयार करण्यात येते.

## निर्वाचक मंडळ

या निर्वाचक मंडळात पुढील दोन प्रकारच्या प्रतिनिधींचा मतदार म्हणून समावेश केला जातो. त्यानुसार —

१. भारताच्या सर्व घटकराज्यांच्या विधानसभेतील निर्वाचित सदस्य
२. भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहातील निर्वाचित सदस्य

यांना राष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार असतो. राष्ट्रपतीच्या निवडणूकीतील निर्वाचक मंडळातील सर्व सदस्यांच्या मताचे मूल्य समान नसते. तर लोकसंख्या व सदस्य संख्या यांच्या प्रमाणात ते ठरविण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला जातो.

### १. विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य —

कोणत्याही घटक राज्यातील विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य निश्चित करताना, त्या राज्याची लोकसंख्या विचारात घेतली जाते. त्यानुसार प्रत्येक विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य पुढील सुत्राने काढले जाते.

$$\frac{\text{संबंधित राज्याची लोकसंख्या}}{\text{संबंधित राज्याच्या निर्वाचित विधानसभा सदस्यांची संख्या}} \times \frac{1}{1000} = \text{संबंधित राज्यातील निर्वाचित विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य}$$

## २. संसद सदस्यांच्या मताचे मूल्य

संसदेच्या प्रत्येक निर्वाचित सदस्यांच्या मताचे मुल्य पुढील सुत्राने ठरविले जाते.

| | | |
|---|---|---|
| सर्व घटकराज्यांच्या विधानसभातील निर्वाचित सदस्यांच्या एकूण मताचे मूल्य<br>———————<br>संसदेच्या दोन्ही सभागृहातील निर्वाचित सदस्यांची संख्या | = | संसदेच्या दोन्ही सभागृहातील प्रत्येक सदस्यास प्राप्त होणाऱ्या मताचे मूल्य |

या सूत्रांनी निर्वाचक मंडळातील प्रत्येक निर्वाचित सदस्यांच्या मताचे मूल्य निश्चित होते. या निवडणूकीसाठी एकल संक्रमणीय मतदान पध्दतीचा अवलंब केला जात असल्यामुळे मतदार मतदानाच्या वेळी उमेदवारांच्या नावापुढे आपला पसंतीक्रम नोंदवून मतदान करतात.

## निवडून येण्यासाठी आवश्यक मतसंख्या

राष्ट्रपती पदावर निवडून येणारा उमेदवार निर्विवाद बहूमताने निवडून यावा. यासाठी उमेदवाराला किमान किती मते मिळणे आवश्यक आहे हे ठरविले जाते. याला कोटा असे म्हणतात. जो पर्यंत कोणीही उमेदवार मतांचा आवश्यक कोटा पूर्ण करत नाही तो पर्यंत विजयी घोषित केला जात नाही. हा कोटा किंवा आवश्यक मतसंख्या पुढील सूत्राने ठरविली जाते.

| | | |
|---|---|---|
| एकुण मतसंख्या<br>———————<br>निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या + 1 | + 1 = | निवडून येण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मतांची संख्या (कोटा) |

एकदा कोटा निश्चित झाल्यानंतर मतमोजणीच्या वेळी मतदाराने दर्शविलेल्या पसंतीक्रमानुसार वेगवेगळ्या उमेदवारांना मिळालेल्या प्रथम पसंतीची मते मोजली जातात. या पहिल्या फेरीत आवश्यक मतसंख्ये इतकी मते ज्या उमेदवारास मिळतात, तो विजयी म्हणून घोषित केला जातो. आवश्यक मते (कोटा) पूर्ण न झाल्यास, दुसऱ्या फेरीत सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवाराला स्पर्धेतून बाद करून, त्याच्या मतपत्रिकेतील द्वितीय क्रमांकाची मते

मोजली जातात. ही प्रक्रिया एखाद्या उमेदवाराला निवडून येण्यासाठी आवश्यक मते (कोटा) मिळेपर्यंत चालू राहते. त्यामुळे विजयी उमेदवार हा बहुमतानेच निवडून येतो.

भारतीय राज्यघटनेद्वारा राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत त्या पदाचा कार्यभार सांभाळण्याठी उपराष्ट्रपती पदाची तरतूद केली आहे. उपराष्ट्रपतींची निवड संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांनी मिळून बनणाऱ्या निर्वाचक मंडळाद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधींत्वाच्या एकल संक्रमणीय मतदान पध्दतीने केली जाते.

भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिध्द अध्यक्ष या नात्याने राज्यसभेचे कामकाज चालवितात. तसेच राष्ट्रपतीच्या अनुपस्थितीत त्यांना राष्ट्रपतीपदाची जबाबदारी सांभाळावी लागते.

## २ब्ध लोकसभा

लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह असून त्याला प्रथम सभागृह असेही म्हणतात. प्रत्यक्ष जनतेतून निवडून आलेल्या प्रतिनिधीचे हे सभागृह असल्याने ते महत्वाचे सभागृह आहे.

## लोकसभेची रचना

लोकसभेची रचना भारतीय राज्यघटनेने पुढीलप्रमाणे विहित कोली आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ नुसार घटकराज्यातून निवडून येणारे प्रतिनिधी हे ५३० पेक्षा जास्त असणार नाहीत व केंद्रशासित प्रदेशातून निवडून येणारे सदस्य २० पेक्षा जास्त असणार नाहीत. हे सर्व सदस्य प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे जनतेतून निवडले जातील.ॲग्लो इंडियन जमातींना यात योग्य प्रतिनिधीत्व मिळाले नसेल तर त्यांचे दोन सदस्य नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला आहे.तसेच भारतीय राज्यघटनेद्वारे अनुसूचित जाती जमातींना लोकसभेत प्रतिनिधीत्व देण्यासाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जातीसाठी ७९ आणि अनुसूचित जमातीसाठी ४१ मतदारसंघ राखीव आहेत.

## लोकसभा सदस्यांची निवडणूक पद्धती

लोकसभा सदस्यांची निवड प्रादेशिक प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीने केली जाते. त्यानुसार जेवढे प्रतिनिधी निवडावयाचे, तितके प्रादेशिक विभाग पाडले जातात. त्यांनाच ‘मतदारसंघ’ असे म्हणतात. लोकसभेच्या प्रत्येक मतदार संघात साधारणतः दहा लाख लोकसंख्या असते.प्रत्येक घटक

राज्याला दिलेले प्रतिनिधीत्व व मतदारसंघातील लोकसंख्या यांचे परस्पर प्रमाण व्यवहार्य राहिल याचा विचार केला जातो. २००१ च्या जनगणनेच्या आधारे लोकसभा मतदारसंघ व प्रतिनिधीत्व निश्चित करण्यात आले असून, त्याची मुदत २१ फेब्रुवारी २००२ च्या चौऱ्याऐंशीव्या घटनादुरुस्तीने २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

प्रत्येक मतदारसंघातून एकच प्रतिनिधी निवडला जातो. लोकसभा सदस्यांची निवड गुप्त व प्रौढ मतदान पद्धतीने प्रत्यक्ष जनतेकडून होते. आपल्या वयाची १८ वर्षे पुर्ण असणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. प्रत्येक मतदारसंघातून कितीही उमेदवार निवडणूक लढवीत असले, तरी मतदारांना फक्त एकच मत देण्याचा अधिकार असतो. निवडणूकीला उभे राहिलेल्या उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते मिळवणारा उमेदवार विजयी म्हणून घोषित केला जातो. लोकसभेच्या विजयी उमेदवाराला खासदार असे संबोधण्यात येते.

## लोकसभा सदस्यांसाठी पात्रता

लोकसभेची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारासाठी राज्यघटनेच्या कलम ८४ नुसार पात्रतेच्या अटी पुढीलप्रमाणे निश्चित केल्या आहेत.

१द्ध ती व्यक्ती भारताची नागरिक असली पाहिजे.

२द्ध तिचे वय २५ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

३द्ध संसदेने कायदा करून वेळोवेळी निहित केलेल्या अटी तिने पूर्ण केल्या पाहिजे.

४द्ध राखीव मतदार संघातून निवडणूक लढविणारी व्यक्ती त्याच राखीव प्रवर्गाची असली पाहिजे.

५द्ध तिचे नाव संसदीय मतदारसंघाच्या यादीत मतदार म्हणून नोंदविलेले असले पाहिजे.

६द्ध ती व्यक्ती सरकारी लाभाच्या पदावर, परकीय, वेडी, दिवाळखोर, भ्रष्टाचारी असल्यास अशा व्यक्ती निवडणूकीस पात्र ठरणार नाहीत.

## लोकसभेचा कार्यकाल

सर्वसाधारण परिस्थितीत लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. पण मुदत संपण्यापूर्वी लोकसभा बरखाास्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो. अशी मुदतपूर्व लोकसभा बरखास्त केल्यास सहा महिन्याच्या आत लोकसभेची निवडणूक घेणे बंधनकारक असते.

राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात संसदेत ठराव संमत करून लोकसभेची मुदत एक वर्षांनी वाढविता येते. पण आणीबाणीची घोषणा संपुष्टात आल्यानंतर सहा महिन्याच्या आत निवडणूका घेणे आवश्यक असते.

## लोकसभेचे पदाधिकारी - सभापती व उपसभापती

भारतीय राज्यघटनेच्या कलम ९३ ते ९७ मध्ये लोकसभेचा सभापती व उपसभापती यांच्या संबंधी तरतूद केली आहे. लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या अधिवेशनात लोकसभा सदस्य आपल्या सभागृहाच्या दोन सदस्यांची अनुक्रमे सभापती व उपसभापती म्हणून निवड करतात. लोकसभेचे कामकाज सभापतींच्या नियंत्रणाखाली चालते. त्यांच्या गैरहजेरीत सभागृहाचे कामकाज उपसभापती पाहतात. या दोघांच्या अनुपस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी सहा सदस्यांचे ‘सभापती मंडळ’ असते व त्यातील सदस्य क्रमाक्रमाने सभागृहाचे कामकाज चालवितात.

सभापतींचा कार्यकाल लोकसभेच्या कार्यकालाइतकाच म्हणजे पाच वर्षांचा असतो. सभापती स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात किंवा त्यांच्याकडून गैरवर्तन झाल्यास लोकसभा त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव संमत करून त्यांना पदावरून दूर करू शकते. लोकसभा विसर्जित झाल्यानंतर नविन लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनापर्यंत सभापती आपल्या पदावर राहू शकतात.

## सभापतीचे अधिकार व कार्ये

सभापती हा लोकसभेचा प्रमुख असून तो सभागृहाचा मार्गदर्शक व नियंत्रक असल्याने त्याने आपले कार्य निर्भीड. निष्पक्ष व न्याय्य भूमिकेतून करावे अशी अपेक्षा असते. त्यांना राज्यघटनेने दिलेले अधिकार पुढील प्रमाणे —

१) सभागृहात शिस्त राखून सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविण्याची जबाबदारी सभापतींची असते .

२)सभागृहातील घटकांशी विचारविनिमय करून महत्वाच्या विषयावरील चर्चेचे नियोजन करणे, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा घडवून आणणे व सभागृहात चर्चेला येणाऱ्या विषयांच्या कामाची रूपरेषा ठरविण्याचा अधिकार सभापतीला असतो .

३) सभागृहाचे नियम. संकेत व सभापतींचे आदेश न पाळणाऱ्या लोकसभा सदस्यांचे सदस्यत्व काही काळ रद्द करण्याचा किंवा त्याला सभागृहाबाहेर काढण्याचा सभापतीला अधिकार असतो .

४) सभापतींच्या परवानगीशिवाय कोणत्याही सदस्याला भाषण करता येत नाही किंवा आपले मत मांडता येत नाही .

५) सभागृहातील गोंधळामुळे कामकाज चालविणे शक्य नसल्यास सभापती सभागृहाचे कामकाज काही काळासाठी तहकूब करू शकतो . तसेच गणसंख्या पूर्तीसाठी आवश्यक इतके सदस्य सभागृहात उपस्थित नसतील तर सभागृहाचे कामकाज तहकूब करतात .

६)एखादे विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार सभापतींचा असतो . तसेच इतर सर्व विधेयके सभागृहात मांडण्यापूर्वी त्यांची परवानगी घ्यावी लागते .

७)सर्वसाधारण परिस्थितीत सभागृहातील मतदानात सभापती भाग घेत नाहीत पण एखादया विधेयकावर समसमान मते पडल्यास सभापती आपले निर्णायक मत देऊ शकतो . त्याच्या एका निर्णा यक मतामुळे विधेयक संमत किंवा असंमत होते .

८) सभागृहातील सदस्यांचे अधिकार व सन्मान सुरक्षित ठेवण्याचे कार्य सभापती करतात .

९) नवीन विधेयके चर्चेस ठेवणे, चर्चा घडवून आणणे, त्यावर मतदान घेणे व निर्णय जाहिर करण्याचा अधिकार सभापतींचा असतो .

१०) संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान स्विकारणे इ .

## गणसंख्या

लोकसभा या सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असणारी सदस्य संख्या म्हणजे गणसंख्या होय. यासाठी एकूण सदस्य संख्येच्या (१\९०) एक दशांश सदस्य सभागृहात असावे लागतात. म्हणजेच किमान ५५ सदस्य हजर असल्याशिवाय लोकसभेच्या कामकाजास सुरवात करता येत नाही.

संसदेचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार राष्ट्रपतींचा असून, वर्षातून किमान दोन अधिवेशने भरविणे आवश्यक आहे. पण या दोन अधिवेशनातील विश्रांतीचा काळ सहा महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये अशी अट घालण्यात आली आहे. या बरोबरच राष्ट्रपतींना आवश्यकता वाटल्यास ते दोनपेक्षा अधिकचे अधिवेशन बोलावू शकतात.

## ३. राज्यसभा

संघराज्यात केंद्रीय कायदे मंडळाचे एक सभागृह घटकराज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे असते.त्याप्रमाणे भारतातील 'राज्यसभा' हे घटक राज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह असून त्याला वरिष्ठ किंवा व्दितीय सभागृह म्हणून संबोधले जाते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ७९ ते ९२ मध्ये राज्यसभेची रचना , स्वरूप या विषयी तरतूद केली आहे.

## राज्यसभेची रचना

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८० नुसार राज्यसभेची सदस्य संख्या जास्ती -जास्त २५० निश्चित केली आहे. त्यापैकी २३८ प्रतिनिधी हे घटकराज्याचे आणि केंद्रशासित प्रदेशातून निवडले जातात. उर्वरित १२ प्रतिनिधी राष्ट्रपतींकडून साहित्य, कला, वाङ्मय, समाजसेवा, खेळ, विज्ञान अशा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत लोकांमधून नियुक्त केले जातात.

## राज्यसभा सदस्यांची निवडणूक पद्धती

राज्यसभेत सर्व घटकराज्यांना समान प्रतिनिधीत्व न देता ते लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात आले आहे. ज्या घटक राज्यांची लोकसंख्या जास्त त्यांना जास्त जागा, तर ज्या घटक राज्यांची लोकसंख्या कमी त्यांना कमी जागा दिल्या आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार उत्तरप्रदेश या घटक

राज्याची लोकसंख्या सर्वात जास्त म्हणून त्याला ३१ जागा आहेत. तर महाराष्ट्राला -१९, पंजाब -७, मिझोराम, नागालॅंड, मणिपूर यांना प्रत्येकी १ असे प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे.

प्रत्येक घटक राज्यातील राज्यसभा सदस्यांची निवड घटक राज्यांच्या विधानसभेच्या निर्वाचीत सदस्यांकडून केली जाते. याचा अर्थ राज्यसभा सदस्यांची निवड जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून होते. ही निवड प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या क्रमदेय एक मतदान पद्धतीने होते. या पद्धतीनुसार उमेदवाराला विजयी होण्यासाठी किमान मतसंख्या मिळविणे आवश्यक असते. ही किमान मतसंख्या पुढील सुत्राच्या आधारे ठरविली जाते.

$$\frac{\text{विधानसभेची निर्वाचीत सदस्य संख्या}}{\text{प्रतिनिधींची संख्या} + १} + १ = \text{किमान मत संख्या}$$

मतदारांनी मतदान करताना उमेदवारांचा पसंती क्रम दयावायचा असतो. जे उमेदवार किमान मतसंख्येइतकी प्रथम क्रमांकाची मते प्राप्त करतील ते विजयी होतात. या पद्धतीमुळे घटक राज्याच्या विधानसभेतील विविध राजकीय पक्षांना आपल्या विधानसभेतील संख्या बळाच्या आधारावर आपले प्रतिनिधी राज्यसभेत पाठविण्याची संधी मिळते.

केंद्रशासित प्रदेशातील राज्यसभा प्रतिनिधीची निवड संसदेने कायदा करून ठरविलेल्या पद्धतीनुसार केली जाते.

## राज्यसभा सदस्यांची पात्रता

राज्यघटनेच्या कलम ८४ नुसार राज्यसभेची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी पात्रतेच्या अटी पुढीलप्रमाणे निश्चित केल्या आहेत.

१द्ध ती व्यक्ती भारताची नागरिक असली पाहिजे.

२द्ध तिच्या वयाची ३0 वर्षे पूर्ण असली पाहिजेत.

३द्ध संसदेने कायदा करून वेळोवेळी निहित केलेल्या अटी तिने पूर्ण केल्या पाहिजे.

४द्ध ज्या घटकराज्यातून ती व्यक्ती निवडणूक लढविणार आहे त्या घटकराज्याच्या संसदीय मतदार संघाच्या मतदार यादीत तिचे नाव समाविष्ट असले पाहिजे.

तसेच सरकारी नोकर, परकीय, वेडी, निवडणूकीत भ्रष्टाचारी ठरलेली, फौजदारी गुन्हयांतर्ग त तुरूंगवासाची शिक्षा झालेली असल्यास ती व्यक्ती राज्यसभेच्या निवडणूकीस उमेदवार म्हणून अपात्र ठरविली जाते.

## राज्यसभेचा कार्यकाल

राज्यसभा हे स्थायी किंवा कायमस्वरूपी सभागृह आहे.म्हणजेच ते कधीही बरखास्त होत नाही.पण या सभागृहातील प्रत्येक सदस्याचा कार्यकाल सहा वर्षाचा असतो. व या सभागृहातील एक तृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात.आणि तेवढेच नवीन निवडले जातात.

राज्यसभा हे स्थायी सभागृह असल्याने लोकसभा विसर्जित काळात राष्ट्रपतींना कायदेविषयक सल्ला देण्यासाठी व त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ते उपयुक्त ठरते. तसेच सर्व सदस्य एकाच वेळी निवृत्त होत नसल्याने सभागृहातील जुन्या सदस्यांचा अनुभव आणि नवीन सदस्यांच्या उत्साहामुळे राज्यसभेचे कामकाज अधिक जबाबदारीने व कार्यक्षमतेने चालते.

## राज्यसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष

भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.त्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. राज्यसभेचे सदस्य आपल्यामधून एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष सभागृहाचे कामकाज चालवितात. ही दोन्ही पदे एकाच वेळी रिक्त झाल्यास एखादया ज्येष्ठ सदस्याची अध्यक्ष म्हणून राष्ट्रपती निवड करतात. राज्यसभेच्या अध्यक्षांना म्हणजेच उपराष्ट्रपतींना पदावरून दूर करण्याचा अधिकार संसदेला आहे.

राज्यसभेचा अध्यक्ष या नात्याने उपराष्ट्रपती राज्यसभेवर देखरेख व नियंत्रण ठेऊन सभागृहाचे कामकाज चालवितो. सभागृहातील चर्चेचे विषय, सदस्यांच्या भाषणाचा अधिकार व वेळ, चर्चेला घ्यावयाचे प्रश्न, प्रस्ताव, विधेयके, विधेयकावरील मतदान, निर्णय, सभागृहातील शिस्त व शांतता आणि एखादया विधेयकावर समसमान मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार अध्यक्षास

असतो. सभागृहाचे संचालन मार्गदर्शन व नियमन अध्यक्षास करावे लागते. तसेच गणपूर्ती म्हणजे एक दशांश सदस्य म्हणजेच २५ सदस्य हजर असल्याशिवाय सभागृहाचे कामकाज सुरू करता येत नाही.

## बद्ध राज्य स्तर

भारताने संघराज्यशासन पद्धतीचा स्विकार केला असुन भारतात २९ घटकराज्ये आहेत. प्रत्येक घटकराज्यासाठीच्या विधिमंडळ रचनेचा व कार्याचा तपशील भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या विभागातील तिसऱ्या प्रकरणात कलम १६८ ते २१२ मध्ये देण्यात आला आहे. घटकराज्यातील कनिष्ठ सभागृहाला विधानसभा आणि वरिष्ठ सभागृहाला विधान परिषद असे म्हणतात. भारतातील घटकराज्यात राज्य विधिमंडळाबाबत दोन पद्धतींचा वापर केला असून, महाराष्ट्र, कार्नाटक, उत्तरप्रदेश, बिहार व जम्मू - काश्मिर या पाच घटकराज्यातच व्दिगृही कायदेमंडळ म्हणजेच विधानसभा व विधान परिषद अस्तित्वात आहे. उर्वरित सर्व घटकराज्यात एकगृही कायदेमंडळ म्हणजे फक्त विधानसभा हे एकच सभागृह अस्तित्वात आहे. घटकराज्याच्या कायदेमंडळातील सदस्यांना आमदार असे संबोधण्यात येते.

## विधान सभा

भारतातील प्रत्येक घटकराज्यात विधानसभा हे कनिष्ठ सभागृह राज्यघटनेच्या कलम १७० नुसार निर्माण केले आहे. प्रत्यक्ष जनतेकडून निवडून आलेल्या प्रतिनिधींचे हे सभागृह असल्याने विधानसभेला राज्यपातळीवरच्या राज्यकारभारात महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

## विधानसभेची रचना

विधानसभेचे सदस्य प्रत्यक्ष जनतेकडून निवडले जातात. भारतीय राज्यघटनेनुसार विधानसभेची जास्तीत जास्त सदस्य संख्या ५०० आणि कामीत कमी ६० इतकी ठरविण्यात आली आहे. घटकराज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ही सदस्य संख्या कमी - जास्त असते. उत्तरप्रदेश विधानसभेची सदस्य संख्या सर्वात जास्त म्हणजे ४०३ इतकी आहे. तर विशेष परिस्थितीत त्या नियमात सुधारणा करून अरूणाचल प्रदेश, गोवा, मिझोराम व सिक्कीम यांच्या विधानसभेची सदस्य संख्या ६० पेक्षा कमी आहे, तर महाराष्ट्र विधान सभेची सदस्य संख्या २८८ इतकी आहे.

२००१ च्या जनगणनेच्या आधारे विधानसभा प्रतिनिधीत्व निश्चित करण्यात आले असून त्याची मुदत २२ जून २००३ च्या अधिनियमाद्वारे २०२६ पर्यंत कायम ठेवण्यात आली आहे. विधानसभेत अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातींसाठी कलम ३३२ नुसार त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा राखीव ठेवल्या आहेत. तसेच राज्यपालांना ॲग्लोइंडियन समाजातून एक प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार दिला आहे.

## विधानसभा सदस्यांची निवडणूक पद्धती

विधानसभेचे सदस्य हे प्रादेशिक प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीने निवडले जातात. भौगोलिक सलगता व लोकसंख्या या घटकांचा विचार करून जितके सदस्य निवडायचे असतील तितके त्या घटकराज्याचे प्रादेशिक मतदारसंघ निर्माण केले जातात व प्रत्येक मतदारसंघातून एक प्रतिनिधी निवडला जातो. साधाराणत: २ लाख ५० हजार ते ३ लाख २५ हजार इतक्या मतदारांसाठी एक प्रतिनिधी अशी रचना असते. विधानसभा सदस्यांची निवड प्रौढ व गुप्त मताधिकार पद्धतीने प्रत्यक्ष जनतेकडून होते. निवडणूकीत कितीही उमेदवार उभे असले तरी मतदाराला एकच मत देण्याचा अधिकार असतो. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते मिळविणारा उमेदवार विजयी होतो.

## विधानसभा सदस्यासाठी पात्रता

विधानसभा सदस्यत्वासाठी पात्रतेच्या अटी पुढील प्रमाणे -

१) ती व्यक्ती भारताची नागरिक असली पाहिजे.

२) तिने वयाची २५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.

३) संसदेने कायदा करून वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी तिने पूर्ण केल्या पाहिजेत.

उमेदवार वेडा, दिवाळखोर, परकीय असल्यास, केंद्र -राज्य प्रशासनात किंवा आर्थिक लाभाच्या पदावर असल्यास त्याला अपात्र ठरविले जाते. तसेच कोणतीही व्यक्ती एकाच वेळी दोन सभागृहाचा सदस्य असू शकत नाही, असल्यास त्याला कोणत्याही एका सभागृहाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दयावा लागतो.

## विधान सभेचा कार्यकाल

राज्यघटनेच्या कलम १२७ नुसार विधान सभेचा कार्यकाल पाच वर्षाचा असेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

पण घटकराज्याचा कारभार घटनात्मकरित्या चालविणे अशक्य झाले आहे, असा अहवाल राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे पााठविल्यास, राष्ट्रपती ३५६ व्या कलमानुसार राज्याची विधानसभा बरखास्त करून तेथे राष्ट्रपती राजवट लागू करतात. तसेच देशात राष्ट्रीय आणीबाणी घोषित झाल्यास संसद कायदा करून विधानसभेची मुदत एक वर्षांनी वाढवू शकते. पण आणीबाणी संपुष्टात येताच सहा महिन्याच्या आत विधानसभेची निवडणूक घ्यावीच लागते. राज्यपाल विशिष्ट परिस्थितीत पाच वर्षाचा कार्यकाल संपण्यापूर्वी विधानसभा बरखास्त करू शकतात.

## विधानसभेचे पदाधिकारी - सभापती व उपसभापती

विधानसभेच्या पहिल्या बैठकीत विधानसभा सदस्य आपल्यातील दोन व्यक्तींची सभापती व उपसभापती पदी निवड करतात. साधारणतः सभागृहातील बहुमत प्राप्त पक्षाचा सभापती असतो, तर उपसभापती पद विरोधी पक्षाला देण्याचा संकेत आहे. या पदावरील व्यक्तीने निष्पक्ष व तटस्थ कार्य करावे अशी अपेक्षा असते. सभापती व उपसभापती यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. तरीही ते आपल्या इच्छेनुसार मुदत पूर्वी आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. तसेच त्यांना पदच्युत करण्याचा अधिकार विधानसभेला असतो. पण त्या संबंधाची लेखी सूचना १४ दिवस अगोदर त्यांना देणे बंधनकारक असते. त्यानंतर अविश्वास ठराव एकूण सदस्य संख्येच्या बहूमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्य संख्येच्या बहूमताने संमत करून त्यांना पदच्युत करता येते.

विधानसभा बरखास्त झाल्यास नविन विधानसभेचे पहिले अधिवेशन होईपर्यंत पूर्वीचाच सभापती अधिकार पदावर राहतो. सभागृहाचे कामकाज सभापतींच्या गैरहजेरीत उपसभापती पाहतात.

## सभापतींचे अधिकार व कार्ये

विधानसभा सभापतींचे अधिकार व कार्ये पुढील प्रमाणे -

१) सभागृहाचे अध्यक्षस्थान भूषविणे. सभागृहात सादर होणारी विधेयके, प्रश्न उपप्रश्न, ठराव, सूचना इ. बाबींना औपचारीक संमती देणे.

२) सभागृहात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करून शिस्त राखणे व सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविणे.

३) विधानसभा कामकाजाच्या नियमांबाबत मतभेद निर्माण झाल्यास सभापती त्या नियमांचा अर्थ स्पष्ट करतात.

४) सभागृहातील गणपूर्ती अभावी किंवा गोधंळ निर्माण झाल्यास सभापती सभागृहाचे कामकाज तहकूब करू शकतात.

५) विधानसभा सदस्यांना भाषणासाठी परवानगी व वेळ ठरवून देणे.

६) सभागृहाच्या सदस्यांचे हक्क आणि विशेषाधिकार यांची जपणूक करणे.

७) एखादे विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही हे ठरविणे.

८) सर्वसामान्य परिस्थितीत सभापती मतदानात भाग घेत नाहीत, पण एखाद्या विधेयकावर समसमान मते पडल्यास सभापती आपले निर्णायक मत देतात.

सभापती हे पद अत्यंत महत्वाचे पद असून, सभापती हा निष्पक्ष व न्यायप्रिय असणे आवश्यक आहे. सभागृहाच्या कामकाजात त्यांचा निर्णय अंतिम असल्याने सभागृहाची प्रतिष्ठा व मान राखण्याची जबाबदारी सभापतींची असते. संयमी, निरपेक्ष, तटस्थ व्यक्ती सभागृहाचे सभापती पद चांगल्याप्रकारे भूषविते.

## विधान परिषद

घटक राज्याच्या कायदेमंडळाचे वरिष्ठ किंवा द्वितीय सभागृह म्हणजे विधान परिषद हे सभागृह होय. भारतीय राज्यघटनेच्या कलम १६९ नुसार घटकराज्यात विधान परिषद निर्माण करण्याचा किंवा रद्द करण्यासंबंधीचा ठराव विधानसभेने विशेष बहुमताने पास केल्यास त्या संबंधी कायदा करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे.

## विधान परिषदेची रचना

१९५६ च्या सातव्या घटनादुरूतीनुसार ज्या राज्यात विधान परिषद असेल, त्या विधान परिषदेतील सदस्य संख्या विधानसभेतील सदस्य संख्येच्या एक तृत्तीयांश पेक्षा जास्त असणार नाही व ४० पेक्षा कमी असणार नाही. या नियमानुसार ज्या घटक राज्यात विधानपरिषद आहेत त्यांची सदस्य संख्या पुढीलप्रमाणे: बिहार - ७५, कर्नाटक - ७५,

जम्मू-कश्मीर - ३६, उत्तरप्रदेश - ९९, तर महाराष्ट्र विधान परिषदेत ७८ सदस्य आहेत. विधान परिषदेत निवडले जाणारे सदस्य पुढील वेगवेगळया क्षेत्रातून व त्या प्रमाणातच निवडून येतात.

१. १/३ सदस्यांची निवड विधानसभा सदस्यांकडून केली जाते.
२. १/३ सदस्यांची निवड राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधीं मार्फत केली जाते.
३. १/१२ सदस्य पदवीधर मतदारसंघातून निवडले जातात.
४. १/१२ सदस्य शिक्षक मतदासंघातून निवडले जातात.
५. १/६ सदस्य साहित्य, कला, विज्ञान, समाजसेवा, सहकार अशा क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तीमधून राज्यपाल नियुक्त करतात.

## विधान परिषद सदस्याची पात्रता

विधान परिषदेच्या सदस्यासाठी पुढील पात्रतेच्या अटी आहेत.

१. ती व्यक्ती भारताचा नागरिक असली पाहिजे.
२. तिच्या वयाची ३० वर्षे पूर्ण असली पाहिजेत.
३. संसदेने कायदा करून वेळोवेळी विहित केलेल्या अटी त्याने पूर्ण केलेल्या असाव्यात.

उमेदवार व्यक्ती दिवाळखोर, वेडी, न्यायालयाने गुन्हेगार ठरविलेली किंवा केंद्र/राज्य सरकारच्या सेवेत आर्थिक लाभ घेणारी असल्यास तिला अपात्र ठरविले जाते. शिवाय निवडणूक कायद्याचा भंग केला म्हणून न्यायालयाने दोषी ठरविलेल्या व्यक्तीस अपात्र ठरविले जाते.

## विधान परिषदेचा कार्यकाल

विधान परिषद हे कायमस्वरूपी किंवा स्थायी सभागृह असून ते कधीही बरखास्त होत नाही. विधान परिषदेच्या प्रत्येक सदस्याचा कार्यकाल सहा वर्षाचा असतो. दर दोन वर्षांनी एक तृतीयांश सदस्य निवृत्त होतात आणि तितकेच सदस्य संबंधीत मतदारसंघातून नव्याने निवडले जातात.

## विधान परिषद सदस्यांची निवडणूक पध्दती

विधान परिषदेत प्रत्यक्ष निवडणूक, अप्रत्यक्ष निवडणूक व नेमणूक अशा तीन पध्दतीचा वापर करून विधान परिषदेतील पाच प्रकारचे सदस्य निवडले जातात.

१. पदवीधर व शिक्षक मतदारसंघातून ज्या सदस्यांची निवड होते ती प्रत्यक्ष निवडणूक होय. कारण पदवीधर व शिक्षक मतदार हे प्रत्यक्ष मतदान करून आपले प्रतिनिधी विधान परिषदेत पाठवतात.
२. विधान सभा व स्थानिक स्वराज्य संस्थातील प्रतिनिधींकडून होणारी विधान परिषद सदस्यांची निवडणूक ही अप्रत्यक्ष निवडणूक होय. कारण यामध्ये लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी विधान परिषदेतील आपले प्रतिनिधी निवडतात.

३. याशिवाय राज्यपालांकडून काही सदस्य विधानपरिषदेत नियुक्त केले जातात ही नेमणूकीची पध्दत होय.

विधान परिषदेच्या सदस्यांची निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधीत्वांच्या क्रमदेय एक मतदान पध्दतीने होते. क्रमदेय एक मतदान पध्दतीनुसार मतदाराने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचा पसंती क्रम लावावयाचा असतो. निवडून येण्यासाठी उमेदवाराला किमान मतसंख्येइतके मतदान मिळणे आवश्यक असते. उमेदवाराला निवडून येण्यासाठी आवश्यक असणारी किमान मतसंख्या पुढील सूत्राने ठरविली जाते.

$$\frac{\text{एकूण वैध मतदान}}{\text{प्रतिनिधींची संख्या} + १} + १ = \text{किमान मतसंख्या}$$

अशी किमान मतसंख्या जो उमेदवार प्राप्त करील तोच उमेदवार विजयी घोषीत केला जातो. विधान परिषदेतील प्रतिनिधीत्वाच्या तरतूदी संसदेने केलेल्या कायद्याने ठरविल्या असल्याने त्यात बदल करण्याचा अधिकार भारतीय संसदेलाच आहे.

## विधान परिषदेचे पदाधिकारी — अध्यक्ष व उपाध्यक्ष

विधान परिषदेचे सदस्य आपल्या मधूनच दोन व्यक्तीची अध्यक्ष व उपाध्यक्षपदी निवड करतात. सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविणे, कामकाजाच्या नियमांबाबत मतभेद निर्माण झाल्यास त्या नियमांचा अर्थ स्पष्ट करणे, विधान परिषद सदस्यांचे हक्क आणि विशेषाधिकार यांची जपणूक करणे इ. कार्ये विधान परिषदेच्या अध्यक्षांची असतात.

याबरोबरच सभागृहात विधेयक मांडणे, प्रश्न — उपप्रश्न विचारणे, ठराव मांडणे, चर्चेत सहभाग घेणे यासाठी अध्यक्षांची औपचारिक संमती आवश्यक असते. वादविवादाच्या प्रसंगात अध्यक्षांना निर्णय द्यावा लागतो. एखाद्या विधेयकावर समसमान मते पडल्यास अध्यक्ष निर्णायक मत देतात. तसेच गणसंख्ये अभावी सभागृहाचे कामकाज तहकूब करू शकतात.

अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष सभागृहाचे कामकाज चालवितात, तेव्हा अध्यक्षांना असणारे सर्व अधिकार त्यांना प्राप्त होतात.

## क) स्थानिक स्तर

देशातील जनतेच्या जीवनातील प्रश्न, समस्या हया, ते राहत असलेल्या प्रदेशाच्या भौगोलिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तयार झालेले असतात. त्यामुळे जनतेच्या गरजा स्थानिक पातळीवर सोडविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आल्या. त्यांना स्थानिक शासन व्यवस्था असेही म्हणटले जाते. स्थानिक

शासन म्हणजे ज्यांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून केली जाते अशा संस्थांचे शासन होय. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण केल्यामुळे व जबाबदार शासन निर्माण केल्यामळे, जनतेच्या मनात शासनाविषयी आपलेपणाची भावना निर्माण झाली आहे. असा राजकीय दृष्ट्या समृध्द समाज निर्माण करण्याच्या हेतूने या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाला आधुनिक भारतात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठीचे प्रयत्न**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४८ साली केंद्रीय आरोग्यमंत्री अमृत कौर यांनी देशातील सर्व राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्था मंत्र्यांची दिल्लीत बैठक बोलावली. तिचे उद्घाटन करताना पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले, — 'स्थानिक स्वराज्य संस्था ह्या खऱ्या अर्थाने लोकशाही शासनव्यवस्थेचा आधार आहेत व असावयासच पाहिजेत. आम्हास अशी सवय झाली की, आम्ही लोकशाहीचा प्रशासनाच्या उच्चस्तरावरच विचार करीत असतो. खालच्या स्तरावर नाही. परंतु खालचा आधार मजबूत होत नाही. तो पर्यंत वरच्या स्तरावरील लोकशाही सफल होत नाही'.

साहजिकच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व लक्षात घेऊन, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पावले उचलली गेली. २६ जानेवारी १९५० ला भारतीय राज्यघटनेचा स्विकार केल्यानंतर राज्यघटनेच्या कलम ४० मध्ये असे म्हटले आहे की, "राज्य हे ग्रामपंचातींची सुसूत्रव्यवस्था लावण्यासाठी कार्यप्रवण होईल व त्यांना स्वराज्याचे मूलभूत घटक म्हणून कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी आवश्यक असतील अशा शक्ती व प्राधिकार बहाल करील."

राज्यघटनेच्या सातव्या अनुसूचीतील राज्य सूचीच्या ५ व्या मुद्द्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"स्थानिक प्रशासन म्हणजे महानगरपालिका, सुधारणा विश्वस्त मंडळे, जिल्हा मंडळे, खाणी वस्ती प्राधिकरणे आणि स्थानिक स्वयंशासन किंवा ग्रामप्रशासन यांच्या प्रयोजनार्थ असलेली अन्य स्थानिक प्राधिकरणे यांची घटना व त्यांचे अधिकार"

अशा प्रकारे भारतीय राज्यघटनेने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाची गरज प्रतिपादली व मार्गदर्शक तत्त्वांमध्ये राज्यसंस्थेला याबाबत कार्यप्रवण होण्याचे मार्गदर्शन केले. या स्थानिक संस्थांवर कोणत्या जबाबदाऱ्या टाकता येतील व त्यांची रचनात्मक बांधणी कशी करता येईल. यासाठी केंद्रसरकारे वेगवेगळ्या समित्या नेमून सातत्याने त्या संस्थांचा अभ्यास केला आहे. त्यातील काही महत्त्वाच्या व निर्णायक उपाय योजना सुचविणाऱ्या समित्याचा आढावा पुढीलप्रमाणे -

**बलवंतराय मेहता समिती**

२ ऑक्टोंबर, १९५२ ला केंद्रसरकारने ग्रामीण विकासाशी संबंधीत ' सामूहिक विकास कार्यक्रम' सुरू केला. ग्रामीण जनतेचा सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास साधणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या बरोबरच ३ ऑक्टोंबर १९५३ ला या कार्यक्रमास पूरक 'राष्ट्रीय विस्तार योजना' सुरू करण्यात आली. या दोन्ही योजनास सुरूवातीस लोकांचे सहकार्य मिळाले, पण काही दिवसातच या योजना असफल झाल्या. या

कार्यक्रमांच्या अपयशाबाबत १९५५ मध्ये संसदेत चर्चा झाली, व या दोन्ही कार्यक्रमांचे मूल्यमापन करण्यासाठी बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १६ जानेवारी १९५७ ला एक समिती स्थापन केली. त्या समितीचे डी.पी.सिंग, व्ही.जी.राव व ठाकूर फुलसिंग हे सदस्य होते.

**बलवंतराय मेहता समितीचा अहवाल**

बलवंतराय मेहता समितीने आपल्या अहवालात स्पष्ट केले की, स्थानिक हितसंबंधाकडे लक्ष पुरविणारी, स्थानिक जनतेच्या इच्छेप्रमाणे व गरजांप्रमाणे पैशाचा व्यय होतो की नाही हे कसोशीने पाहणारी लोकांची प्रातिनिधीक अशी एक लोकशाही संस्था जो पर्यंत आपण निर्माण करीत नाही, तसेच तिला पुरेसे अधिकार व उत्पन्नाची साधने उपलब्ध करून देत नाही, तो पर्यंत विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास स्थानिक जनतेला उत्साह वाटणे शक्य नाही. घटकराज्य सरकारांपेक्षा खालच्या स्तरावर जबाबदारीचे व सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे बनले आहे.

आपआपल्या विभागाच्या विकासाची जबाबदारी ज्या संस्थेकडे दिली जाईल त्या संस्थेकडे संपूर्ण सत्ता सुपूर्द करून, राज्यसरकारने केवळ मार्गदर्शनाचे, देखरेख करण्याचे व वरिष्ठ पातळीवरील नियोजनाचे कार्यच फक्त राज्यसरकारने करावे. तसेच आवश्यकता वाटल्यास अशा संस्थांना विकास कामासाठी अधिक पैसा उपलब्ध करून द्यावा. अशा प्रकारे राज्यसरकारचे अधिकार मर्यादीत करीत या समितीने ग्रामीण भारताची पुनर्रचना करताना सत्ता विकेंद्रीकरणाचा पाया घातला. पंचायती राज्याची संघटना तयार करताना बलवंतराय मेहता समितीने संघटनेचे स्वायत्त स्वरूप व निर्वाचित प्रतिनिधी या दोन गोष्टींवर विशेष भर दिला व पंचायत राज्याची त्रिस्तरीय रचना मांडण्यात आली. त्यानुसार -

१) उच्चस्तर — जिल्हापातळी — जिल्हापरिषद

२) मध्यमस्तर — विकासगटपातळी — पंचायतसमिती

३) कनिष्ठस्तर — ग्रामपातळी — ग्रामपंचायत

या शिफारशीप्रमाणे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थात जिल्हापरिषद — पंचायतसमिती — ग्रामपंचायत अशी त्रीस्तरीय संस्थांची निर्मिती करण्यात आली.

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार केंद्रसरकारने सर्व घटकराज्यांना पंचायतीराज्य व्यवस्था सुरु करण्याचे आदेश दिले. प्रत्येक घटकराज्याला त्यांच्या सोईनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना करण्याची मुभा देण्यात आली. त्यामुळे प्रत्येक घटकराज्यांनी आपल्या सोईनुसार, आपल्यास योग्य असेल अशी संरचना स्विकारली. त्यानुसार आंध्रप्रदेश, पंजाब, कर्नाटक यांनी त्रिस्तरीय रचना, जम्मू आणि काश्मिरने द्विस्तरीय व गोवा या तत्कालीन केंद्रशासित प्रदेशाने एक स्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थांची संरचना तयार केली.

महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्याची परिस्थिती व बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी यांचा योग्य मेळ घालण्यासाठी महाराष्ट्राचे तत्कालीन महसुल मंत्री वसंतराव

नाईक यांच्या अध्यक्षतेखाली २७ जुन १९६० ला एक समिती स्थापन केली. नाईक समितीने ही बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी व त्यावेळी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा अभ्यास करुन २२६ शिफारशी महाराष्ट्र सरकारला १५ मार्च १९६१ रोजी सादर केल्या. यावर आधारित 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१' या अधिनियमास महाराष्ट्र विधानमंडळाने मान्यता दिली. या अधिनियमास ५ मार्च १९६२ रोजी राष्ट्रपतीकडून मान्यता मिळाल्यानंतर १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायतराज्य व्यवस्था अस्तित्वात आली.

**अशोक मेहता समिती**

भारतीय पंचायतराज व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी व अस्तित्वात असलेली व्यवस्था अधिक सक्षम कशी करता येईल यावर उपाय सूचविण्यासाठी केंद्रातील जनता पक्षाच्या सरकारने १२ डिसेंबर १९७७ ला अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली.

या समितीत विविध क्षेत्रातील बारा तज्ञ सदस्यांचा समावेश होता. समितीने १२,००० प्रश्नावल्या राज्यशासनाचे विविध विभाग, संघटना, अधिकारी व तज्ञ अशा व्यक्तींकडून भरून घेतल्या. तसेच बैठका, चर्चासत्रे याखेरीज १५०० लोकांशी या विषयावर प्रत्यक्ष चर्चा करून आपला अहवाल २१ ऑगस्ट १९७८ ला पंतप्रधानांकडे सुपूर्द केला. या अहवालातील समितीच्या काही महत्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे –

१) ग्रामविकास साधण्यासाठी पंचायतराज व्यवस्था द्विस्तरीय असावी. यामध्ये मंडळ समिती स्थापन कराव्यात. जिल्हापरिषद व मंडळ पंचायतीच्या निवडणूका एकाच वेळी घ्याव्यात व त्या सदस्यांचा कालावधी ४ वर्षांचा असावा.

२) जिल्हा परिषदेत सहा प्रकारच्या सदस्यांचा समावेश असावा.

अ)निर्वाचित सदस्य

ब)मंडळ पंचायतीचे सभापती

क)मोठया नगरपालिकांचे अध्यक्ष

ड) दोन महिला सदस्य

इ) दोन स्वीकृत सदस्य – त्यातील एक ग्रामीण विकास तज्ञ व दुसरा शिक्षण तज्ञ असावा.

फ) अनुसूचीत जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा राखीव असाव्यात.

३) दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी 'जिल्हा सामाजिक न्याय समिती' असावी.

४) पंचायतराज संस्थांना उत्पादनाची योग्य साधने असावीत व त्यांना कर आकारण्याचा अधिकार असावा.

५) केंद्र – राज्य आर्थिक संबंध, ज्याप्रमाणे वित्त आयोगा मार्फत निश्चित केले जतात, त्याच प्रमाणे राज्यसरकार व पंचायतराज संस्थांचे आर्थिक संबंध निश्चित करावेत.

या अहवालानंतरही तत्कालीन नियोजन आयोगाचे अध्यक्ष श्री. जी. व्ही. के . राव यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण विकास व दारिद्रय निर्मुलनात प्रशासकीय यंत्रणा

परिणामकारक कशी ठरेल, याबाबतच्या सूचना करण्यासाठी २५ मार्च १९८५ मध्ये समिती नेमली. तसेच १९८६ मध्ये डॉ. एल.एम.सिंघवी समिती ग्रामीण विकास मंत्रालयाकडून पंचायतराज व्यवस्थांना अधिक सक्रिय बनविण्यासाठी नेमली. याबरोबरच १९८८ मध्ये श्री. पी. के. थुंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्याची शिफारस केली.

श्री. पी. के. थुंगन समितीच्या अहवालानुसार १५ मे १९८९ रोजी घटनादुरूस्ती विधेयक मांडले. पण घटकराज्यांच्या अधिकारांकडे दुर्लक्ष व सर्वच घटकराज्यांना एकच संरचना या कारणांनी हे विधेयक संमत होऊ शकले नाही. या सर्व बाबींचा विचार करून विरोधी पक्षांनी एस. आर. बोम्मई यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीने नव्याने ६४ वे घटनादुरूस्ती विधेयक मांडले, ते लोकसभेत मंजूर झाले, पण राज्यसभेत नाही. त्या नंतर व्हि. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पंचायती राज्याच्या संदर्भातील घटनादुरूस्ती विधेयक ७ सप्टेंबर १९९० ला संसदेत मांडले. पण सरकार फार काळ न टिकल्याने त्यावर चर्चा झाली नाही.

**७३ वी व ७४ वी राज्यघटनादुरूस्ती**

पुढे पी.व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने सप्टेंबर १९९१ मध्ये पंचायती व नगरपालिका अशी दोन राज्यघटना दुरूस्ती विधेयके संसदेत मांडली. त्यांस डिसेंबर १९९२ मध्ये लोकसभा व राज्यसभा यांनी मान्यता दिली. संसदेच्या मान्यतेनंतर ही विधेयके घटक राज्यांच्या संमतीसाठी पाठविण्यात आली. निम्म्यापेक्षा जास्त घटकराज्यांनी त्याला मान्यता दिल्यानंतर २० एप्रिल १९९३ रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी त्यास संमती दिली व त्याचे रूपांतर ७३ व्या व ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीत झाले.

७३ व्या राज्यघटना दुरूस्ती विधेयकाने २४ एप्रिल १९९३ पासून पंचायती कायदा अस्तित्वात आला व या नवीन कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. ७३ व्या राज्यघटना दुरूस्तीने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थासंबंधी 'पंचायती' या शीर्षकाखाली एक नवीन प्रकरण 'भाग ९' राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले. यामध्ये कलम २४३ ते २४३ ओ असे १६ अनुच्छेद आहेत. याबरोबरच ७३ व्या राज्यघटना दुरूस्ती कायद्याने राज्यघटनेत ११ वे परिशिष्ट समाविष्ट करून पंचायतराज्य संस्थांच्या अखत्यारीत येणाऱ्या २९ विषयांचा त्यात समावेश केला. ही ७३ वी राज्यघटना दुरूस्ती २४ एप्रिल १९९३ पासून अंमलात आली.

७४ वी राज्यघटना दुरूस्ती नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधीत आहे. ७४ व्या घटनादुरूस्तीने 'नगरपालिका' या शीर्षकाखाली एक नवीन प्रकरण 'भाग—९अ' ( Part IX –A) हे राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले. या भागात कलम २४३ पी ते कलम २४३ झेड जी असे १८ अनुच्छेद आहेत. या ७४ व्या राज्यघटना दुरूस्ती कायद्याप्रमाणे राज्यघटनेत बारावे परिशिष्ट समाविष्ट करून नगरपालिकांच्या अखत्यारीत येणाऱ्या १८ विषयांचा अंतर्भाव त्यात करण्यात आला. ही ७४ वी राज्यघटना दुरूस्ती १ जून १९९३ पासून अंमलात आली.

**७३ वी राज्यघटना दुरूस्ती**

७३ व्या राज्यघटना दुरूस्तीने ग्रामीण पंचायतीराज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला. त्यानुसार पंचायतराज संस्थांची म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व ग्रामसभा यांची निर्मिती, रचना, अधिकार व कार्ये, निधी, पंचायतराज्यासाठी वित्त आयोग, राज्य निवडणूक आयोग, लेखापरिक्षण, आरक्षणाबाबतच्या तरतूदी करण्यात आल्या.

तसेच ७३ व्या घटनादुरूस्तीने राज्यघटनेच्या कलम २४३ मध्ये जिल्हा, पंचायत, ग्राम, ग्रामसभा या शब्दांच्या व्याख्या निसंदिग्धपणे स्पष्ट करण्यात आल्या. पंचायतराज्य संस्थांची निर्मिती करणे ही घटकराज्यांची 'घटनात्मक जबाबदारी' बनली. या दुरूस्तीनुसार पंचायतराज्य संस्थांची जिल्हास्तर, मध्यमस्तर व ग्रामस्तर अशा तीन स्तरानुसार -जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय निर्मिती करण्यात आली . तसेच ज्या घटकराज्यांची लोकसंख्या २० लाखांपेक्षा कमी आहे, अशा घटकराज्यांनी मध्यम स्तरावरील पंचायत समिती ही संस्था निर्माण केली नाही तरी चालेल अशी मुभा देण्यात आली आहे .

यातील अत्यंत महत्वाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत प्रत्यक्ष लोकशाही कारभार चालविण्याच्या अनुषंगाने समाविष्ट असणाऱ्या काही बाबींचे विश्लेषण पुढील प्रमाणे

## १) ग्रामसभा

प्रत्यक्ष लोकशाहीचा अविष्कार या अनुषंगाने ग्रामसभेकडे पाहिले जाते . गावाचा कारभार गावातील सर्व प्रौढ मतदारांना ग्रामसभेत समाविष्ट करून घेऊन चालविण्यासाठी ग्रामसभेची निर्मिती करण्यात आली आहे .साधारणत: १८ वर्षावरील सर्व मतदार नागरिकांची सभा म्हणजे ग्रामसभा होय .त्यामुळे ग्रामसभा ही गावातील सर्व मतदारांची सभा , तर ग्रामपंचायत म्हणजे ग्रामसभेची कार्य कारिणी होय . ग्रामपातळीवर स्वातंत्र्य,समता ,बंधुता व न्याय प्रस्थापित करणारी व प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग करणारी एक कार्यक्षम संस्था या अनुषंगाने ग्रामसभेकडे पाहिले जाते .त्या दृष्टीने ग्रामसभा ही संस्था खूप महत्वाची ठरते .

## ग्रामसभेच्या बैठका

ग्रामसभेच्या प्रत्येक आर्थिक वर्षात किमान दोन बैठका घेणे बंधनकारक आहे .पण ग्रामसभेला जास्तीत जास्त अधिकार देण्याच्या केंद्रसरकारच्या धोरणास अनुसरून २००३ पासून महाराष्ट्र शासनाने एक अधिनियम पारित करून प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या सहा सभा घेण्याची तरतूद केली आहे, त्यानुसार -

१) पहिली ग्रामसभा - एप्रिल महिन्यात

२)दुसरी ग्रामसभा - १५ ऑगस्ट रोजी

३) तिसरी ग्रामसभा - ऑक्टोंबर महिन्यात

४) चौथी ग्रामसभा — २६ जानेवारी रोजी

व ५) पाचवी, ६) सहावी ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या सोईनुसार घेण्यात यावी असे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामसभा घेण्याची जबाबदारी सरपंचाची व त्याच्या अनुपस्थितित उपसरपंचाची असते. सर्वसाधारण पहिल्या ग्रामसभेच्या बैठकीचा अध्यक्ष सरपंच असतो. त्यानंतरच्या ग्रामसभेत उपसरपंच किंवा ग्रामसभा निवड करेल ती व्यक्ती अध्यक्षपद भूषवित असते. यातील १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजीच्या ग्रामसभा घेणे अनिवार्य असते. तसेच ग्रामसभेच्या दोन बैठकीतील अंतर तीन महिन्यापेक्षा जास्त असणार नाही. या सर्व ग्रामसभा पैकी दलित वस्तीमध्ये एक ग्रामसभा घेणे व महिलांची एक ग्रामसभा घेणे आवश्यक आहे.

ग्रामसभेच्या बैठका घेण्यात सरपंच,उपसरपंच यांचेकडून टाळाटाळ झाल्यास त्यांना अपात्र ठरविले जाऊ शकते. तथापी ग्रामसभेच्या या बैठका न बोलविण्याच्या कारणांची योग्यायोग्यता तपासून त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

ग्रामसभेच्या कामाकाजासाठी आवश्यक गणसंख्या म्हणजे गावाच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारसंख्येच्या १५% किंवा १०० व्यक्ती यापैकी जी संख्या कमी असेल तितके लोक उपस्थित असणे आवश्यक असते.

**ग्रामसभेची कामकाज पध्दती**

ग्रामसभेच्या बैठकीचे नियमन अध्यक्ष करतो. प्रत्येक बैठकीच्या सुरूवातीस मागील सभेचा कार्यवृत्तांत ग्रामपंचायत सचिव वाचून दाखवितात व ग्रामसभेची मंजुरी घेऊन कायम करतात. त्यानंतर विषय पत्रिकेतील विषय क्रमाक्रमाने चर्चेसाठी घेतले जातात. ग्रामसभेत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सरपंचांना द्यावी लागतात. तसेच ग्रामसभेच्या कामकाजाचा वृत्तांत बांधणी पुस्तकाच्या स्वरूपात ठेवण्यात आला पाहिजे व त्याची एक प्रत सभा झाल्यापासून सात दिवसाच्या आत जिल्हा ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडे पाठवली पाहिजे, असा नियम आहे.

पंचायत राज्यव्यवस्थेत ग्रामसभेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर त्या गावाच्या समस्या, विकास आराखडा, मार्गदर्शक सूचना व विकास कार्याचा आढावा प्रत्यक्ष त्या गावातील लोक घेऊ शकतात. त्यामुळे लोकांच्या सहभागाने व सहकार्याने गावाचे प्रश्न सोविण्याच्या दृष्टीने ग्रामसभेची भूमिका दिवसेंदिवस महत्त्वाची ठरत आहे.

**२) आरक्षणाची तरतुद**

समाजातील कमकुवत वर्गाच्या लोकांना पंचायतराज्य संस्थामध्ये वास्तव व अर्थपूर्ण सहभाग मिळावा, यासाठी ७३ व्या राज्यघटनादुरूस्तीने पंचायतराज संस्थेच्या तिन्ही स्तरावर अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमातीच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात

राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली. तसेच इतर मागास प्रवर्गातील लोकांच्यासाठी पंचायतराज संस्थांमध्ये राखीव जागा ठेवण्यासंबंधी कायदा करण्याचा अधिकार राज्य कायदेमंडळांना प्रदान केला आहे.

या बरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थामधील एकूण जागांपैकी एक—तृतीयांश म्हणजे ३३ % जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती व इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या जागांपैकी एक —तृतीयांश जागा त्या—त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद या घटनादुरूस्तीने केली. पण आता महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात या घटकराज्यांनी महिलांचे आरक्षण पंचायतराज्य संस्थांच्या एकूण जागांपैकी एक—द्वितीयांश म्हणजेच ५०% केले आहे.

**३) राज्य निवडणूक आयोग**

पंचायतराज संस्थांच्या निवडणूकीसंबंधी महत्त्वाची तरतूद म्हणजे राज्य निवडणूक आयोगाची स्थापन होय. या निवडणूक आयोगात एक राज्य निर्वाचन आयुक्ताचा समावेश असून त्यांची नियुक्ती राज्यपालांमार्फत केली जाते. त्यांना पदच्युत करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला पदच्युत करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पध्दतीचा अवलंब करावा. तसेच त्याच्या कालावधीत त्याच्या सेवा, शर्तीमध्ये त्याला प्रतिकुल ठरतील असे बदल करता येणार नाहीत, अशी तरतूद आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका नियमीत होण्याच्या दृष्टीने या आयोगाला महत्त्व प्राप्त झाले आहे. हा आयोग मतदार याद्या तयार करणे, निवडणूका घेणे, निर्वाचन प्रक्रियेची देखरेख करणे, नियंत्रण व मार्गदर्शन करणे इत्यादी कार्ये करते. पंचायतराज संस्थांच्या निवडणूकीच्या संदर्भातील सर्व घटकांबाबत राज्यघटनेतील तरतूदींच्या आाधीन राहून आवश्यक कायदे करण्याचा अधिकार घटकराज्यांच्या कायदेमंडळाला असतो.

## ७४ वी राज्यघटना दुरूस्ती

या ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.या दुरूस्तीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात नागरी संस्थांची वर्गवारी, कार्य-काल ,राज्य वित्त आयोग ,निवडणूक आयोग ,जिल्हा नियोजन समिती ,महानगर नियोजन समिती ,प्रभाग समित्या इ.बाबत तरतूद करण्यात आली. ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीने ष्नगरपालिकाष या शीर्षकाखाली भाग ९. अ हा राज्यघटनेत समाविष्ट केला व त्यामध्ये २४३ पी ते २४३ झेड जी असे अनुच्छेद अंतर्भूत केले.याशिवाय भारतीय राज्यघटनेत बारावे परिशिष्ट जोडून त्यात नागरी संस्थांनी करावयाच्या १८ विषयांची यादी दिली आहे.

या घटनादुरूस्तीने तीन प्रकारच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती केली. त्यानुसार.

१) नगरपंचायत . ग्रामीण क्षेत्रातून नागरीक्षेत्रामध्ये संक्रमण होत असलेल्या क्षेत्रासाठी नगरपंचायत

२) नगरपरिषद . थोडया लहान नागरी क्षेत्रासाठी नगरपरिषद

३) महानगरपालिका . अधिक मोठया नागरी क्षेत्रासाठी महानगरपालिका

ते करत असताना लोकसंख्या , लोकसंख्येची घनता , स्थानिक प्रशासनासाठी जमा होणारा महसूल , कृषीतर कार्यातील रोजगाराची टक्केवारी आणि आर्थिक महत्व इ. निकष विचारात घेतले जातात.

## नगरपालिकांची रचना

नगरपालिकांची रचना या घटनादुरूस्ती कायदयाने स्पष्ट केली आहे.या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य त्या नगरपालिका क्षेत्रातील लोकांकडून प्रत्यक्षरित्या निवडले जातील.त्या करीता ष्प्रभागष या नावाने स्थानिक मतदार संघ निर्माण केले जातात. प्रत्येक प्रभागातून एक लोकप्रतिनिधी याप्रमाणे नगरपालिकेतील सदस्यांची निवड प्रत्यक्ष जनेतेकडून होते. याबरोबरच नगरपालिकांचे अध्यक्ष व काही विशेष व्यक्तींच्या नियुक्तीबाबत कायदा करण्याचा अधिकार राज्य कायदेमंडळाला देण्यात आला आहे.

## प्रभाग समित्या

७४ व्या राज्यघटना दुरूस्तीने तीन लाख किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नगरपालिका क्षेत्रात एक किंवा अधिक प्रभागाचा समावेश असलेल्या प्रभाग समित्या स्थापन करण्याची तरतूद केली आहे.या प्रभाग समित्यांच्या मार्फत लोकप्रतिनिधी व मतदार यांच्यात प्रत्यक्ष संपर्क रहावा आणि नागरिकांच्या समस्या, अडचणी , सोडविल्या जाव्यात असे अपेक्षित आहे. या प्रभाग समित्यांची रचना कशी असावी , त्यांचे प्रादेशिक क्षेत्र कोणते व या समितीतील जागा कोणत्या पद्धतीने भरल्या जाव्यात या संबंधीची तरतूद करण्याचा अधिकार राज्याच्या कायदेमंडळाला देण्यात आला आहे. प्रभाग समित्यां व्यतिरिक्त अन्य समित्यांची स्थापना करण्याचा अधिकारही राज्य कायदेमंडळाला देण्यात आला आहे.

## आरक्षणाची तरतूद

नागरी समाजातील अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती यांना योग्य प्रतिनिधीत्व देण्याच्या हेतूने नगरपालिकांमध्ये त्यांच्यासाठी ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीने राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. या राखीव जागांची संख्या त्या नगरपालिका क्षेत्रातील अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती यांच्या लोकसंख्येचे, त्या नगरपालिका क्षेत्रातील एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल तेवढेच राहिल. तसेच इतर मागास प्रवर्गाच्या लोकांसाठी नगरपालिकेत राखीव जागांची तरतूद करण्याचा अधिकार राज्य कायदेमंडळाला देण्यात आला आहे.

या बरोबरच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था मधील एकूण सर्वसाधारण जागांपैकी एक. तृतीयांश म्हणजे ३३% जागा सर्वसाधारण महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती व इतर मागास वर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या जागांपैकी एक. तृतीयांश म्हणजे ३३% जागा त्या . त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद या घटनादुरूस्तीने केली आहे. महाराष्ट्रासह काही घटकराज्यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या एकूण जागांपैकी एक. व्दितीयांश म्हणजे ५०% जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत.

## राज्य निवडणूक आयोग

घटकराज्यांचे राज्यपाल कलम २४३ मधील उपकलमांनुसार एक राज्य निवडणूक आयोग स्थापन करतील अशी तरतूद होती. ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एकच राज्य निवडणूक आयोग असून, हा आयोग नगरपालिकांच्या सर्व निवडणूकांसाठी मतदार यादी तयार करण्याचे कार्य करतो. तसेच निवडणूकांचे कार्यक्रम तयार करणे, नियंत्रण ठेवणे व प्रत्यक्ष निवडणूका घेण्याचे काम करतो.

## ७३ व ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीचे महत्व

ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाश्वत विकासाच्या दृष्टिने ७३ व ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीने महत्वाची पावले उचलली आहेत. या कायदयाने ष्पंचायती' व ष्नगरपालिकाष या स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा लाभल्याने, त्यांच्या स्थैर्यात, सातत्यात व प्रतिष्ठेत वाढ झाली

आहे. त्या संस्था आता घटकराज्य सरकारच्या मर्जीनुसार निर्माण होणाऱ्या व कार्य करणाऱ्या संस्था राहिलेल्या नाहित.तर राज्यघटनेने निर्माण केलेल्या स्थानिक पातळीवरील संस्था असे नवे स्वरूप त्यांना प्राप्त झाले आहे.

लोकशाही शासनव्यवस्थेतील सत्ता व जबाबदारी वितरणाचा शेवटचा स्तर म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थाना महत्व आहे. देशाच्या राजकीय, सामाजीक, आर्थिक प्रवाहात समाजातील सर्वच घटकांना सहभागी करून घेण्याची प्रकिया ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पातळीवर सुरू झाली आहे. त्यामुळे राष्ट्रविकासाच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्था महत्वाच्या बनल्या आहेत.या संस्था स्थानिक जनतेने प्रश्न, व अडचणींचे, त्याच स्तरावर निवारण करून जनतेला एक समाधानकारक जीवनपद्धती निर्माण करून देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

घटनादुरूस्तीने ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना घटनात्मक दर्जा देताना, घटकराज्यांच्या अधिकारांचा संकोच होणार नाही याची ही दक्षता घेतली आहे.त्यानुसार या स्थानिक संस्थांच्या वेगवेगळ्या अंगांशी संबंधीत कायदे करण्याचा अधिकार राज्य कायदेमंडळाला देण्यात आला आहे. या घटनादुरूस्तीने निर्माण झालेल्या ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था या स्थानिक शासनाचा प्रभावी घटक म्हणून गेली पंचवीस वर्षे कार्यरत आहेत.

## संदर्भ ग्रंथ —


१. भारतीय राज्यघटना — भारत सरकारद्वारा मुद्रित

२. Introduction to the Constitutition of India - Dr. Durga Das Basu

३. स्थानिक स्वराज्य संस्थांची मूलतत्त्वे, लोकप्रशासन व अमेरिका, इंग्लंड व वेल्स आणि फ्रांसमधील स्थानिक शासन — विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्र, मुंबई.

# सुशासन

## प्रस्तावना

सुशासन या संकल्पनेचा उदय १९९० च्या दशकात झाला. पारदर्शिकत्व, उत्तरदायित्व, प्रतिसादात्मकता, स्थैर्य, समता आणि सर्वसमावेशकता याचा समावेश शासनाच्या सरंचना आणि प्रक्रियेमध्ये करणे म्हणजे सुशासन होय. जेव्हा कोणतेही शासन आपली ध्येय धोरणे आखताना व त्यांची अंमलबजावणी करताना वरिल तत्त्वांचा आधार घेते तेव्हा त्यास सुशासन असे म्हणतात.

जागतिक बॅंकेने आपल्या १९८९ सालातील 'सब-सहारन आफ्रिकेतील चिरस्थायी विकासाच्या अहवालामध्ये सुशासन ही संकल्पना, तिचे तत्वज्ञान आणि उपयोजन पहिल्यांदा स्पष्टपणे मांडले. याच अहवालात जागतिक बॅंकेने सुशासनाची व्याख्या पुढील चार निर्देशकांद्वारे स्पष्ट केली आहे.

१.सार्वजनिक क्षेत्र व्यवस्थापन

२.उत्तरदायित्व

३.विकासासाठी कायद्याची चौकट

४.माहिती आणि पारदर्शकता

जागतिक बॅंकेने शासन आणि विकास (Governance and Development) या १९९२ साली प्रकाशीत झालेल्या अहवालात पुनश्च सुशासन ही संकल्पना अधिक सविस्तर आणि स्पष्टपणे मांडली. या अहवालानुसार सुशासन या संकल्पनेचे तीन निकष मांडले. ते म्हणजे

१. राजकीय सत्तेचे /शासनाचे स्वरूप कसे आहे?

२. देशातील आर्थिक आणि सामाजिक संसाधनाचे व्यवस्थापन सत्तेचा वापर कोणत्या पद्धतीने केले जाते?

३.धोरण/आराखडे तयार करण्याची आणि त्यांची अंमलबजावणी करण्याची शासनाची क्षमता किती आहे?

**व्याख्याः**

पै.पानंदीकर यांच्या मते “सुशासन म्हणजे अशी व्यवस्था होय ज्या ठिकाणी लोकांचे जीवन शांततापूर्ण, शिस्तबद्ध, प्रगतीशील व सहभाग दर्शविणारे आहे.”

मानवी विकास अहवाल २००२ नुसार “सुशासन म्हणजे शासकीय संस्थांची आणि नियमांची जास्तीत जास्त परिणामकारकता पारदर्शिपणा जनसहभागित्व उत्तरदायित्व पूर्णतः जबाबदारी आणि कायद्याचे राज्य होय.”

थोडक्यात “सुशासन म्हणजे लोकशाहीकरण, कायद्याचे राज्य ,मानवी हक्क ,सहभागात्मक विकास आणि खुल्या व पारदर्शी प्रशासनाच्या दिशेने सध्या चाललेली जागतिक चळवळ होय.”

**<u>सुशासनाची वैशिष्टे</u>**

सुशासनाची महत्वाची वैशिष्टे खालील प्रमाणेः

१. **लोक सहभाग –**

सुशासनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे निर्णय निधारण प्रक्रियेत समाजातील सर्वांचा समान सहभाग होय. लोकांचा सहभाग हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असूं शकतो. मोठी लोकसंख्या असणा–या लोकशाहीत प्रत्यक्ष सहभाग शक्य नसल्यामुळे लोक आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी होतात. त्यासाठीच विविध स्तरावर निवडणूका घेतल्या जातात. लोकांना निवडणूकीत सक्रिय सहभागी होता यावे म्हणून अभिव्यक्ती स्वांतत्र्य, संघटनेचे स्वातंत्र्य असणे आवश्यक असते. भारतीय राज्यघटनेने आपल्या नागरिकांना अभिव्यक्ती स्वांतत्र्य, संघटनेचे स्वातंत्र्य बहाल केले आहे.

परंतू सुशासनामध्ये केवळ निवडणुकीपुरता लोक सहभाग अपेक्षित नसतो, तर लोकांना निर्भिडपणे आपल्या मागण्यांना ध्येय धोरणात प्रतिबिंबित करता येणे हे ही अपेक्षित असते. एवढेच नव्हे तर शासनाच्या ध्येय धोरणांवर चर्चा करणे, त्यावर टिका करणे हेही सुशासनामध्ये अपेक्षित असते. त्यासाठीच समाजातील सर्व घटकांना खुलेपणाने आपली मते मांडता येणे अपेक्षित आहे.

### २. कायद्याचे राज्य—

सुशासनात न्याय्य व निष्पक्ष अशी कायद्याची चौकट असणे गरजेचे असते. एवढेच नव्हे तर कायदा त्या देशातील सर्व नागरिकांसाठी समान असणे आवश्यक असते. भारतामध्ये कायद्याचे राज्य असून सर्व कायदे सर्व नागरिकांसाठी समान आहेत, तसेच कायद्यापुढे सर्व समान आहेत. भारतीय नागरिकांना राज्यघटनेने विविध अधिकारही दिलेले आहेत. नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण होण्यासाठी आणि कायद्याच्या राज्याची सुस्थापना होण्यासाठी स्वतंत्र आणि निष्पक्ष न्यायालय आवश्यक असते तसेच प्रभावी पोलिस यंत्रणेचीही गरज असते. भारतात या दोनही संस्था कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यात आपले योगदान देत आहेत. कायद्याच्या संरक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी भारतात गरीब आणि गरजू लोकांसाठी मोफत कायदेविषयक सहाय्य योजना अस्तित्वात असून त्यामाध्यमातून गरीबांना मोफत वकील दिला जातो. ज्यायोगे ते आपल्या हक्कांची जपणूक करू शकतील. भारतीय नागरिकांना आपले हक्क कोणते आहेत, कोणते कायदे आहेत याची जाणीव करून देण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम संयोजित करणे हेही सुशासनात अभिप्रेत आहेत. तसेच सर्वांना न्याय मिळावा, कायद्याची मदत मिळावी यासाठी न्यायालयीन आणि कायदेविषयक सुधारणा करणे हेही सुशासनात अपेक्षित असते.

### ३. पारदर्शी शासन :—

शासनाने लिखित नियमांच्या, अधिनियमांच्या आधारे आपला राज्यकारभार करावा असे सुशासनात अपेक्षित असते. एवढेच नव्हे तर शासनाच्या निर्णयांमुळे जे लोक प्रभावित होणार आहेत त्यांना शासकिय निर्णयांची माहिती सहजासहजी उपलब्ध व्हावी हे ही सुशासनात अपेक्षित आहे. शासनाच्या विविध स्तरांवर विविध प्रकारचे निर्णय घेतले जातात, कायदे केले जातात. त्यांची माहिती सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसार माध्यमांचा जसे रेडीओ, टी.व्ही, वृत्तपत्रे यांचा वापर केला जातो. ही माहिती लोकांपर्यंत सोप्या भाषेत आणि ठळकपणे पोहोचवण्यासाठी शासन यंत्रणा प्रयत्नशील असते. भारतात शासन व्यवहारात पारदर्शीपणा आणण्यासाठीच २००५ मध्ये माहिती अधिकाराचा कायदा मंजूर करण्यात आला. ज्याव्दारे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातील म्हणजेच शासकीय, बिनशासकिय कार्यालयातील माहिती मिळवण्याचा नागरिकांना हक्क प्राप्त झाला आहे. या कायद्यान्वये कोणताही नागरिक कोणत्याही सरकारी दस्तऐवजाची **(गुप्त माहिती सोडून)**

सरकारकडून मागणी करू शकतो आणि ४५ दिवसाच्या आत माहिती मिळवू शकतो. या कायद्यामुळे भारतीय शासन अधिक पारदर्शी आणि उत्तरदायी झाले आहे.

**४. प्रतिसादात्मक शासन :—**

शासनाने नागरिकांच्या इच्छा आकांक्षांना, अपेक्षांना प्रतिसाद देणे आवश्यक असते. जेव्हा विविध घटकांच्या मागण्यांचे प्रतिबिंब शासनाच्या ध्येयधोरणात पडते तेव्हा त्या शासनास प्रतिसादात्मक शासन असे म्हटले जाते. कोणतेही शासन जेवढे अधिक प्रतिसादात्मक असते तेवढी त्यास अधिमान्यता अधिक मिळते. म्हणजेच शासनाला अधिक लोकांचा पाठिंबा मिळतो आणि त्यामुळे शासन अधिक प्रभावी होते. शासनाने घेतलेला कोणताही निर्णय ज्यावेळी समाजाला उपयुक्त वाटतो तेव्हा त्यास स्वाभाविकच लोकांचा अधिक प्रतिसाद मिळतो. त्यातून त्या देशामध्ये स्थैर्यही अधिक वाढते.

**५. समंतीवर आधारित शासन :—**

कोणत्याही समाजात विविध विचार प्रवाह असतात, मते असतात. तसेच प्रत्येक व्यक्तीचे, गटाचे हितसंबंधही भिन्न असतात. हे वैविध्य असले तरी सर्वांना मान्य होईल असा सर्व समंतीने घेतलेला निर्णय सुशासनात अपेक्षित असतो. शासन निर्णय घेताना अधिकाधिक लोकांचे हित किंवा सार्वजनिक हित डोळयापुढे ठेवून तसेच भविष्यकालीन आराखडे बांधून सर्वसमंतीने निर्णय घेत असते. यास समंतीवर आधारित शासन असे म्हटले जाते. सुशासनाचे हे एक अविभाज्य वैशिष्टय आहे.

**६. न्याय, समता व सर्वसमावेशकता :—**

ज्या समाजातील सर्व नागरिकांना आपण देशाच्या मुख्य प्रवाहात आहोत, आपण वगळले जात नाही अशी भावना निर्माण होते तेव्हाच त्या समाजात एकात्मता राहते. म्हणूनच शासनाचे सर्व निर्णय, ध्येयधोरणे व उपक्रम, न्याय, समता आणि सर्वसमावेशकता या त्रिसुत्रीवर आधारित असले पाहिजेत. विशेषत: समाजातील वंचित घटकांना, अल्पसंख्यांकांना, स्त्रीयांना, अपंगांना, वृध्दांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते. या सर्व घटकांना स्वत:चे जीवन सुखकारक करता यावे यासाठी शासनाकडून मदत मिळणे हे सर्वसमावेशकतेचे सूत्र असते. त्यासाठीच भारतात या

सर्व वंचित घटकांसाठी विविध धोरणे आणि कार्यक्रम आखले जातात. उदा. राजीव गांधी आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, सुकन्या समृध्दी योजना, जननी सुरक्षा योजना. ज्यावेळी न्याय, समता व सर्वसमावेशकता या त्रिसूत्रीवर शासन अधिष्ठीत असते तेव्हा स्वाभाविकच शासनाची अधिमान्यता वाढते आणि शासन लोकाभिमुख होते.

**७. कार्यक्षम व प्रभावी शासन :—**

शासनाने नुसते कायदे, नियम, धोरण, आराखडा तयार करून थांबता कामा नये. केलेल्या कायद्यांची, नियमांची, धोरणांची आणि योजनांची अमंलबजावणी प्रभावीपणे केली पाहिजे. अंमलात आणलेल्या धोरणांचा, त्यांच्या यशापयशांचा, भेडसावणा—या समस्यांचा इत्यादींचा आढावा वेळोवेळी घेतला पाहिजे. चुकांची दुरूस्ती केली पाहिजे. ज्यामुळे जनतेचा शासनामध्ये विश्वास निर्माण होईल व ते अधिकाधिक प्रभाविपणे शासनाच्या प्रत्येक कृती कार्यक्रमामध्ये हिरीरीने सहभागी होऊन शासनसंस्थेला अधिक दृढ बनवतील.

शासन कार्यक्षम असेल तर धोरणांची अंमलबजावणी प्रभावीपणे होते. कार्यक्षम शासनामुळे विकासाला चालना मिळते व गतिशीलता प्राप्त होते. तसेच कार्यक्षम शासन जनतेमध्ये देखील उर्जा निर्माण करण्यामध्ये सफल होते.

**८. उत्तरदायित्व :—**

लोकांप्रती उत्तरदायित्व हे सुशासनाचे प्रमुख वैशिष्ठ आहे. शासनानी आखलेली ध्येयधोरणे किंवा त्यांची केलेली अमंलबजावणी याबाबत मंत्री, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी लोकांना उत्तरदायी असतात. त्यायोगे सरकारकडून राबविल्या जाणा—या योजना त्याची परिपुर्तता, त्यावर होणारा खर्च इ. संबंधी अकुंश ठेवणे लोकांना शक्य होते. शासनाकडून ज्या योजना राबविल्या जातात त्या लोकांनी दिलेल्या करातून उभ्या राहतात. त्यामुळे शासनाला लोकांप्रती उत्तरदायी असणे आवश्यक असते. म्हणजेच कायद्याचे राज्य आणि पारदर्शीकत्व यांच्याशिवाय उत्तरदायित्व शक्य नसते. सुशासनामध्ये केवळ सरकारी संस्थांनीच उत्तरदायी असणे आवश्यक नसते तर खाजगी क्षेत्र आणि नागरी समाजातील संघटनांनीही लोकांप्रती आणि त्यांच्या त्यांच्या संस्थांमधील घटकांप्रती उत्तरदायी असणे आवश्यक असते.

**शासन, शासन व्यवहार आणि सुशासन :—**

शासन व्यवहार ही संकल्पना अतिशय व्यापक असून यामध्ये शासन प्रक्रिया आणि उद्देशपूर्ती या दोन्हींचा समावेश होतो. त्यामुळे शासन व्यवहार ही एक सर्वव्यापक संकल्पना असुन शासन या संकल्पनेपेक्षा तीची व्याप्ती मोठी आहे. शासन म्हणजे केवळ यंत्रणा किंवा संस्थात्मक रचना तर शासन व्यवहार म्हणजे समाजाच्या आणि लोकांच्या विकासासाठी केलेल्या योजना होय.

शासन व्यवहारामध्ये एकीकडे परस्पर सहभाग आणि सहकार्याचे जाळे असते ज्यायोगे धोरणे निश्चित केली जातात आणि त्याची अमंलबजावणी केली जाते. दुस—या हाताला सुशासन म्हणजे ही सर्व प्रक्रिया केवळ कार्यक्षमपणे करण्यापुरती मर्यादित नाही तर ही प्रक्रिया पारदर्शी, लोकाभिमुख आणि प्रतिसादात्मक असली पाहिजे.

सुशासनामध्ये लोकशाही शासनाच्या संस्थात्मक चौकटीपलिकडे जाऊन अनेक विषयांना जसे प्रातिनिधीक कायदेमंडळ, भेदभाव विरहीत कायदे, कार्यक्षम निष्पक्ष आणि जलद न्यायालयीन प्रक्रिया, पारदर्शी सार्वजनिक क्षेत्र, मानवी हक्कांना संरक्षण, सरकारी अधिका—यांचे उत्तरदायित्व आणि स्थानिकांसाठी साधनसामग्रीचे विकेंद्रीकरण आणि त्यांच्यासाठीचे निर्णयनिर्धारण करणे हे ही सुशासनात अपेक्षित आहे.

सुशासनास ‘SMART’ प्रशासन असेही संबोधले जाते. त्यामध्ये खालील पाच घटकांचा समावेश होतो.

S : SIMPLE सोपे

M : MORAL नैतिकता

A : ACCOUNTABLE उत्तरदायीत्व

R : RESPONSIVE प्रतिसादात्मक

T : TRANSPARENT पारदर्शीपणा

आजच्या अतिशय गुंतागुंतीच्या जगात निर्माण होत असलेल्या अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड देण्यास एकटी शासनसंस्था पुरेशी ठरत नाही. अशा परिस्थीतीत तिने कितीही कार्यक्षमता दाखविली तरी समाजापुढील अनेक प्रश्न तसेच प्रलंबित राहतात. अनिर्णित अवस्थेत राहिलेले असे प्रश्न कालांतराने गंभीर स्वरूप धारण करतात. तेव्हा समाजापुढील सर्वच प्रश्नांचा निपटारा करण्याची जबाबदारी एकटया शासन संस्थेवर न

सोपविता त्या कार्यात अन्य सामाजिक संघटनांनाही सहभागी करून घेणे समाजाच्या दृष्टीने निश्चितच हितकारक ठरते. त्यासाठीच समाजातील अशासकीय व अनौपचारिक अशा संस्थांनाही सहभागी करुन घेतेले जाते. केवळ औपचारिक शासकीय यंत्रणेव्दाराच लोकोपयोगी कामे पार पाडणे पुरेसे नाही तर समाजातील इतर संस्था, संघटना व यंत्रणा यांच्यामार्फतही अशा प्रकारची कामे केली जाऊ शकतात, असे सुशासनामध्ये गृहीत धरण्यात आले आहे. या संदर्भात डेव्हिड ओसर्बान यांनी असे म्हटले आहे की, आम्हास सामर्थ्यवान शासन संस्थेची गरज नाही. आम्हाला चांगल्या शासन संस्थेची गरज आहे. अधिक स्पष्टपणे सांगावयाचे तर आम्हाला शासनसंस्थेपेक्षा चांगल्या राज्यकारभाराची आवश्यकता आहे. चांगला राज्यकारभार याचा अर्थ आपल्या समस्या संयुक्तपणे सोडविण्याची कृती होय.

**भारतात झालेल्या सुशासनाच्या प्रयत्नांचे स्वरूप**

भारतात झालेल्या सुशासनाच्या प्रयत्नांचे स्वरूप खालील प्रमाणे आहे

१. भारतात सुशासनाच्या दिशेने नवव्या पंचवार्षिक योजनेपासुन (१९९७—२००२) सुरवात झाली.तद्नंतर शासनाच्या प्रत्येक पंचवार्षिक योजनांमध्ये म्हणजेच दहाव्या (२००२—२००७), अकराव्या (२००७—२०१२) योजने अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा विस्तार करण्यात आला. बाराव्या (२०१२—२०१७) या योजनेमध्ये सुशासन या संकल्पनेला अधिक व्यापक चालना देण्यात आलेली दिसते.

२. भारतातील प्रत्येक नागरिकाला सर्व पाातळयांवर शासन निवडण्याचा हक्क घटनेने दिला आहे. याचाच अर्थ सुशासन प्रस्थापित करण्यासाठी देशातील सर्व धर्मातील जातीतील वर्गातील घटकांच्या प्रभावी सहभागीतेचा अधिकार भारतीय राज्यघटनेने संरक्षीत केलेला आहे.

३. ७३ वी आणि ७४ वी घटना दुरूस्ती कायदा १९९२ मंजुर करून भारत सरकारने लोकशाही विकेंद्रीकरणाला चालना देऊन, सुशानाच्या दिशेने एक पाऊल उचललेले दिसते. या कायद्याचा उद्‌देश लोकशाहीचे बळकटीकरण करणे आणि सुशासन प्रस्थापित करणे हा होता. सुशासनात जास्तीत जास्त लोकसहभाग वाढविणे, प्रशासन अधिक लोकाभिमुख करून स्थानिक प्रश्न स्थानिक संस्थांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरच सोडविणे अपेक्षित होते.

४. माहिती अधिकार २००५

केंद्र सरकारने ‘माहितीचा अधिकार’ हा १२ ऑक्टोंबर २००५ रोजी संमत करण्यात आला. केंद्रीय माहिती अधिकार २००५ मध्ये कलम १५ नुसार प्रत्येक घटक राज्यात राज्य माहिती आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या अधिकारामुळे प्रशासनातील उणिवा, दोष, गैरप्रकार आणि बेजबाबदारीपणा/उघड करण्यास सोपे झाले आहे. माहिती अधिकार हा एकमेव असा कायदा आहे जो प्रशासनाने पाळावयाचा असुन जनतेने त्याच्यावर नजर ठेवावयाची आहे. माहिती अधिकार कायद्यामुळे भ्रष्टाचार पूर्णपणे संपणार नसला तरी त्याचे प्रमाण निश्चितच कमी झालेले दिसते. विविध कार्यालयातील कामकाजाची माहिती, कागदपत्रे नागरिकांना मिळवता यावी. या उद्‌देशाने हा कायदा करण्यात आला आहे. सुशासनाच्या कारभारात माहितीच्या अधिकारामुळे पारदर्शकता, जबाबदारी आणि लोकसहभाग या तीन बांबींना महत्व प्राप्त झाले आहे.

५. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) २००५

भारतामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना हा कायदा २५ ऑगस्ट २००५ रोजी संमत करण्यात आला. याचा मुख्य उद्‌देश्य भारताच्या ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील जनतेचे विशेषत: अर्धकुशल व अकुशल कामगारांच्या जीवनमानामध्ये सुधारणा घडवून आणणे हा होता. ग्रामीण भागातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीस मनरेगा अंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षात किमान शंभर दिवस काम मिळवून देण्याची हमी हा कायदा देतो. देशातील गरीब श्रीमतांमधील अंतर कमी करण्याचा हा एक प्रयत्न म्हणावा लागेल. या योजनेव्दारे ग्रामीण भागातील गरीबांचा आर्थिक विकास व्हावा, त्यांना तेथेच काम मिळावे हा मुख्य हेतु होता.

६. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) २००५

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान १२ एप्रिल २००५ रोजी सुरवात करण्यात आले. सुरवातीस याचा कालावधी (२००५—२०१२) सात वर्षांचा होता. हे अभियान सुरू करण्यामागे सरकारची भुमिका म्हणजे गरीब दुर्लक्षित तसेच गरजू ग्रामिण जनतेला सहज सोपे, परवडण्यास योग्य, कार्यक्षम, विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही होती. ग्रामीण पातळीवर किमान प्राथमिक आरोग्य सेवा सर्वसामान्या पर्यंत पोहचावी आणि ती कमीत कमी खर्चीक असावी तसेच ती स्वस्थ भारताकडे वाटचाल करणारी असावी हा या अभियानाचा मुख्य हेतु होता. यात मुख्यत: बालके, स्त्रिया या घटकांवर भर दिलेला आहे.

७. वेब पोर्टल (गर्व्हनन्स नॉलेज सेंटर)

महाराष्ट्र शासनाने 'शासन ज्ञान केंद्र' हे वेब पोर्टल २००५ मध्ये स्थापन केले. या पोर्टलमार्फत शासकीय व्यवस्थेशी संबंधीत सर्व माहिती उपलब्ध करुन दिली जाते. ज्यामध्ये विविध जिल्हे, राज्य, आणि केंद्र स्तरावरील विविध शासकीय योजना, धोरणे, याचबरोबर शासन व्यवस्थेशी संबंधीत कार्यालयीन कागदपत्रे, लेख, पुस्तके यांची वेळोवेळी प्रसिध्दी केली जाते, ज्याचा जनतेला फायदा घेता येतो. तसेच त्या संदर्भात काही तक्रारी असल्यास त्याची ऑनलाईन नोंद घेतली जाते. या वेब पोर्टलच्या माध्यमातून जनता आणि शासन यामधील अंतर कमी करण्याचा उद्‌देश असतो.

८. अन्न सुरक्षा कायदा २०१३

केंद्र शासनाने अन्न सुरक्षा कायदा २०१३ ला समंत केला. तसेच राज्यात त्याची अमंलबजाणी १ फेब्रुवारी २०१४ रोजी करण्यात आली. या कायद्यामुळे देशातील जवळपास १२० कोटी पैंकी २/३ जनतेला या कायद्याचा लाभ मिळणार आहे. ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील गरीब व गरजू लोकांना त्यांची भूक भागविता यावी तसेच त्यांना प्रतिष्ठेचे सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा समंत केला आहे. या कायद्यातंर्गत ७५ टक्के ग्रामीण व ५० टक्के शहरी जनतेला प्रतिव्यक्ती, प्रतिमहिना ५ किलो धान्य ( तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, नाचणी इ.) नाममात्र दराने मिळणार आहेत. म्हणजेच अंत्योदय या प्रवर्गातील कुटुंबांना याचा अधिक लाभ होणार आहे.

९. राष्ट्रीय ई—शासन योजना (Nation E-Governance Plan)

भारतामध्ये १९९८ साली केंद्र सरकारने लष्कराचा एक खास विभाग सुरू करून माहिती तंत्रज्ञान आणि संगणक तंत्रज्ञानासाठी ई—गर्व्हनन्स मोहिम सुरू केली. या अंतर्गत सर्व नागरिकांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे सर्व सरकारी सेवा उपलब्ध करून दिली जात आहे. ज्याची सुरूवात १८ मे २००६ रोजी सरकारने राष्ट्रीय ई—शासन योजना म्हणून मंजूर केली. ज्यास ई— क्रांती विकासाचे एक प्रारूप म्हणून देखील ओळखले जाते. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासनाच्या सर्व सेवा माफक दरात प्रभावीपणे पारदर्शकरित्या आणि जलद गतीने सर्वसामान्य माणसाला देण्यासाठी ही सेवा सुरू करण्यात आलेली आहे. नागरिकांना त्यांच्या घरापर्यंत इंटरनेटच्या माध्यमातून एक खिडकी पदध्तीव्दारे शासकीय सेवा उपलब्ध करून

देण्यासाठी ही सेवा सुरू करण्यात आलेली आहे. नागरिकांचा राजकीय सहभाग वाढावा आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख व्हावे. हा या राष्ट्रीय ई –शासन योजनेचा उद्देश आहे.

ई क्रांतीची ध्येये सुलभ शासन, प्रभावी शासन, सुशासन आणि मोबाईल शासन देखील आहे. अशा पद्धतीने भारतात सुशासनाच्या दिशेने वाटचाल सुरू झालेली दिसते.

**समारोप**

सुशासनाचा अर्थ तत्वे व उदाहरणांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, ही एक व्यापक व बहूआयामी संकल्पना आहे. कोणतेही शासन हे सुशासन होण्यासाठी एकीकडे शासनाने पारदर्शी कारभार करणे जसे गरजेचे आहे तसेच प्रत्येक स्तरावर लोकांचा सहभाग वाढविणे व त्या माध्यमातून लोक कल्याणाचे ध्येय साध्य करणे अपेक्षित आहे. म्हणूनच सुशासनाच्या मुल्यांची जपणूक करणे, त्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे, कारण त्याद्वारेच शासन अधिक कार्यक्षमपणे नागरिकांसाठी कार्यरत राहिल.

**संदर्भ ग्रंथ ः**

1. Mitchell W.C., Public Choice in America : An Introduction to American Government, Markham Publishing Company, Chicago, 1971.
2. Osborne and Gaebler T, Reinventing Government: How the Entrepreneurial Spirit is transforming the Public sector, Prentice Hall of India Private Limited, New Delhi, 1992.
3. The World Bank Governance and Development, Washington Dc, 1992.
4. Basu R, Public Administration: Concepts and theories, Sterling Publishers Private Limited, New Delhi, 2004.

## विद्यार्थ्यांनी करावयाच्या अभ्यासात्मक कृती —

विद्यार्थ्यांनी खालील अभ्यासात्मक कृती कराव्यात या दृष्टीकोनातून हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

१. या विषयाच्या अनुषंगाने करण्यात आलेली उपरोक्त सैध्दांतिक मांडणी समजावून देवून विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये लोकशाही तत्त्वांचे पालन करण्यास प्रोत्साहीत करणे.

२. विद्यार्थ्यांनी वेगवेगळया निवडणूकामध्ये सहभागी व्हावे यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे.

३. विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीसाठी प्रचार करण्यासाठी उत्साहित करणे

४. आपल्या वर्गातील कोणी मतदार नोंदणी केली नसेल तर त्याची नोंदणी करून आपला संपूर्ण वर्ग मतदार असल्याची खात्री करावी.

५. शाळा/महाविद्यालयांनी निवडणूक/ लोकशाही प्रक्रिया यासंदर्भात निबंध स्पर्धांचे आयोजन करणे.

६. विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीची किंवा राजकारणामध्ये सहभागी असलेल्या व्यक्तीची अथवा ज्याने कोणत्याही निवडणूकीमध्ये उमेदवार म्हणून निवडणूक लढविली आहे. अशा व्यक्तीची मुलाखत घ्यावी व त्याचे वर्गामध्ये सादरीकरण करावे.

७. कला व उपयोजित कला या शाखेच्या विद्यार्थ्यांनी, नाटक, नाटिका, लघुकथा, लघुनाटिका, लघुचित्रपट, भित्तीपत्रके या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून सादर व तयार करावीत.

८. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वेगवेगळया कृतींच्या आधारे प्रत्येक महिन्याला एका विद्यार्थ्यांस नेता म्हणून घोषित करण्यात यावे.

९. आपल्या महाविद्यालयामध्ये/संस्थेमध्ये अभिरूप निवडणूकांचे आयोजन करण्यात यावे.

# नमुना प्रश्नावली

## लोकशाही

१. ...........यांनी 'लोकशाहीची लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य' अशी व्याख्या केली आहे.

अ) अब्राहम लिंकन ब) लॉर्ड ब्राईस क) प्रा. सिली ड) मॅक्से

२. लोकशाही म्हणजे......... संमतीवर चालणारे शासन होय.

अ) सरकारच्या ब) नोकर वर्गाच्या क) राष्ट्रपती ड) लोकांच्या

३ लोकशाही हा असा शासन प्रकार आहे की ज्यात सामाजिक व आर्थिक परिवर्तन होताना शांततामय व कायदेशीर मार्गाने होते ती व्यवस्था म्हणजे लोकशाही होय अशी व्याख्या...... . . . यांनी केली.

अ) एम. एन. रॉय ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर क) महात्मा गांधी ड) एच. सी. मुखर्जी

४. साम्यवादी देशात ..............लोकशाहीवर भर दिला.

अ) सामाजिक ब) राजकीय क) आर्थिक ड) सांस्कृतिक

५. प्रातिनिधीक लोकशाहीचे खालीलपैकी योग्य .......... दोन पर्याय सांगा?

अ) अध्यक्षीय व संसदीय लोकशाही ब) राजेशाही व अध्यक्षीय

क) संसदीय व राजेशाही ड) नोकरशाही व राजेशाही

६. लोकांनी स्वतःच मुक्त , समान व स्वतंत्र व्यक्ती या दृष्टीने स्वतःवर राज्य करणे असा .........लोकशाहीचा अर्थ आहे.

अ) लोकानुयायी ब) प्रत्यक्ष क) अप्रत्यक्ष ड) यापैकी नाही

७. *लोकशाहीमधील अंतिम सार्वभौम सत्ता ही कोणाच्या हाती असते?*

*अ) लोकांच्या* ब) शासन क) राष्ट्रपती ड) न्यायालय

*८.* मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूका, सार्वत्रिक प्रौढ मताधिकार *ही दोन वैशिष्टे ......* . व्यवस्थेची आहेत?

अ) हुकुमशाही ब) सरंमजामशाही क) लोकशाही ड) यापैकी नाही

९. लोकशाही शासन व्यवस्था ही......... तत्वावर आधारलेली आहे

अ) विकेंद्रीकरण ब) सहकार्य क) नैतिकता ड) स्वैराचार

१०. उदारमतवादी लोकशाहीत ......... च्या विकासावर भर दिला जातो.

अ) समुह ब) व्यक्ती क) कामगार ड) या पैकी नाही

११. इंग्लडच्या राजाकडून नागरी हक्काची सनद ( मॅग्नाचार्टा ) ......... साली मिळाली?

अ) १५१२ ब) १७८९ क) १६८९ ड) १२१५

१३. फ्रेंच राज्यक्रांतीतून कोणती तत्वे जगाला मिळाली?

अ) समता, नैतिकता, बंधुता ब) न्याय, स्वातंत्र, शिक्षण

क) स्वातंत्र, समता, बंधुता ड) धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र, बंधुता

१४. प्रत्यक्ष लोकशाहीचा मार्ग कोणत्या देशात स्विकारला आहेत.

अ) इंग्लड ब) फ्रान्स क) स्वित्झर्लंड ड) रशिया

१५. लोकशाही ही शासन प्रणालीचा असा प्रकार आहे की ज्यात सर्व लोक किंवा त्यांच्यापैकी त्यांनीच निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मार्फत शासकीय सत्तेचा वापर करतात अशी व्याख्या कोणी केली?

अ)जॉन स्टूअर्ट मिल ब) ईसाइ बर्लिन क)जेरेमी बेंथाम ड) टी. एच. ग्रीन

१६. लोकशाहीत वैधानिक मार्गाने शासन बदलण्याचा अधिकार ......असतो.

अ) लोकांना ब) नोकरशाहीला क) पंतप्रधानाला ड) राष्ट्रपतीला

१७. अमेरिका ............ घटक राज्यांचे मिळून एक संघराज्य बनले आहे.

अ) ५० ब) १३ क) ११ ड) ३१

१८. उदारमतवादी लोकाशाही मध्ये ........ महत्व दिले जाते?

अ) व्यक्तीस्वातंत्र्याला ब) शासनास स्वातंत्र्य

क) सामुहिक स्वातंत्र्य ड) यापैकी नाही

१९. ........व्यवस्थेत व्यक्तीविकासासाठी व्यक्तीस्वातंत्र्याचा आग्रह *असतो?*

अ) साम्यवादी शासन व्यवस्था ब) उदारमतवादी लोकशाही

क) हुकुमशाही ड) लष्करी शासन व्यवस्था

२०. भारतामध्ये कोणत्या प्रकारची लोकशाही आहे?

अ) संसदीय लोकशाही ब) अध्यक्षीय लोकशाही

क) प्रत्यक्ष लोकशाही ड) एकाधिकारशाही

२१. संसदीय लोकशाहीत राष्ट्रप्रमुखाची निवड कशी होते?

अ) अप्रत्यक्षरित्या जनतेकडून ब) प्रत्यक्षरित्या जनतेकडून

क) नोकर वर्गाकडून ड) वंशपरंपरेनुसार

२२. संसदीय लोकशाही शासनपध्दतीमध्ये ...... हा दोष आढळतो?

अ) पारदर्शीपणा ब) न्यायप्रशासन क) अकार्यक्षमता ड) जबाबदार प्रशासन

२३. *व्यक्तीचे स्वसंबंध आणि समाजसंबंध असे दोन भाग ......... कोणी पाडलेले आहेत.*

अ) इसाई बर्लिन ब) लॉर्ड ब्राईस क) प्रा. सिली ड) जे. एस. मिल

२४. अमेरिकेत लोकशाहीचा कोणता प्रकार आहे?

अ) अध्यक्षयीय लोकशाही ब) संसदीय लोकशाही

क) सहभागात्मक लोकशाही ड) यापैकी नाही

२५.भारतीय लोकशाहीस कोणत्या देशाच्या लोकशाहीने जास्त प्रभावीत आहे?

अ) इंग्लड ब) चीन क) इराण—इराक ड) यापैकी नाही

# निवडणूका

१) लोकशाहीमध्ये अंतिम सत्ता ...................... च्या हाती असते.

अ) जनतेच्या ब) मंत्र्यांच्या क) प्रशासनाच्या ड) युवकांच्या

२) भारतीय राज्यघटनेत वयाची....... वर्षे पूर्ण करण्याच्या सर्व प्रौढांना मताधिकार दिला जातो.

अ) २० ब) २८ क) १८ ड) १९

३) भारतीय राज्यघटनेने ............ या स्वायत्त घटकाकडे निवडणूकीबातची प्रक्रिया सोपविली आहे.

अ) वित्त आयोग ब) निवडणूक आयोग

क) सरकारिया आयोग ड) नीती आयोग

४) नामधारी किंवा घटनात्मक कार्यकारी प्रमुख ....... हे असतात.

१) मंत्री २) खासदार ३) पंतप्रधान ४) राष्ट्रपती

५) पंतप्रधान व त्यांच्या मंत्रीमंडळाकडे राष्ट्राची ........ कार्यकारी सत्ता असते.

अ)वास्तव ब) अनियमीत क)तात्पूर्ती ड)दीर्घ

६) भारतीय संसदेचे प्रथम किंवा कनिष्ठ सभागृह ........... हे आहे.

अ)राज्यसभा ब)विधान परिषद क)लोकसभा ड)विधान सभा

७) भारतीय राज्यघटनेच्या कलम ८० नुसार राज्यसभेची सदस्य संख्या जास्तीत—जास्त...... ..... निश्चित केली आहे.

अ)२५० ब) २८८ क) ४०३ ड) ७८

८) राज्यसभा हे ........सभागृह आहे.

अ) अस्थायी ब)कनिष्ठ क)स्थायी ड)प्रथम

९) भारतातील घटकराज्यांच्या विधीमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाला ........ असे म्हणतात.

अ)विधान परिषद ब)राज्यसभा क)विधान सभा ड)लोकसभा

१०) महाराष्ट्र विधान परिषदेची सदस्य संख्या ........ आहे.

अ) २८८ ब) ७८ क)२५० ड)५५०

११) बलवंतराय मेहता समितीने पंचायतराज्याची ............ रचना मांडली.

अ)द्विस्तरीय ब)त्रिस्तरीय क) एकस्तरीय ड) यापैकी नाही.

१२) ७३ व्या राज्यघटना दुरूस्तीने .......... पंचायतीराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा दिला.

अ)ग्रामीण ब)शहरी क)निमशहरी ड)यापैकी नाही.

१३) गावातील किंवा ग्रामातील १८ वर्षावरील सर्व मतदार नागरिकांची सभा म्हणजे ........ .. होय.

अ)विधान सभा ब)ग्रामसभा क) प्रभाग सभा ड)मासिक सभा

१४) सध्या महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात या घटकराज्यांनी पंचायतराज्य संस्थांतील महिलांचे आरक्षण ........... केले आहे.

अ) २०टक्के ब) ३०टक्के क) ५०टक्के ड) ६०टक्के

१५) नगरपालिकांसाठी निर्माण केलेल्या स्थानिक मतदार संघाना ..........असे म्हणतात.

अ) प्रभाग ब) भाग क) गण ड) यापैकी नाही.

१६) ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीने ........... स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.

अ) नागरी ब) ग्रामीण क) खेडे ड) यापैकी नाही

१७) ७४ व्या राज्यघटना दुरूस्तीने ......... या शीर्षकाखाली भाग ९ (अ) हा भारतीय राज्यघटनेत समाविष्ठ केला.

अ)पंचायत समिती ब) नगरपालिका क)ग्रामपंचायत ड) यापैकी नाही

१८) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वेगवेगळ्या अंगांशी संबंधीत कायदे करण्याचा अधिकार ... ........ यांना देण्यात आला आहे.

अ) राज्य कायदेमंडळ ब) राज्य कार्यकारीमंडळ

क) राज्यसभा ड) यापैकी नाही

१९) भारतीय राज्यघटनेनुसार विधानसभेची जास्तीत–जास्त सदस्य संख्या.......... इतकी ठरविण्यात आली आहे.

अ) ४०० ब) ५०० क) ३०० ड) २००

२०) महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तरप्रदेश, बिहार व जम्मू–काश्मिर या पाच घटकराज्यात कायदेमंडळाचे ............ द्वितीय सभागृह अस्तित्वात आहे.

अ) विधानसभा ब)राज्यसभा क) विधान परिषद ड) लोकसभा

२१) राज्यसभा सदस्यांचा कार्यकाल ....... वर्षाचा असतो.

अ) ५ ब) ६ क) ४ ड) ७

२२) भारताचे ....... हे राज्यसभेचे पद्सिध्द अध्यक्ष असतात.

अ) राष्ट्रपती ब) पंतप्रधान क) उपराष्ट्रपती ड) मुख्यमंत्री

२३).......... राज्यघटना दुरूस्तीने मताधिकाराचे वय २१ वरून १८ वर्षे करण्यात आले.

अ) ६१ ब) ७३ क) ७४ ड) ४२

२४) भारताने .......... लोकशाही शासन पध्दतीचा स्विकार केला आहे.

अ) अध्यक्षीय ब)संसदीय क) प्रत्यक्ष ड) यापैकी नाही

२५) प्रातिनिधीक लोकशाहीतील राज्यकारभार जनतेने निवडून दिलेल्या.........मार्फत चालविला जातो.

अ) प्रतिनिधींच्या ब) अध्यक्षांच्या क) राजा ड) या पैकी नाही

# सुशासन

१. जागतिक बँकेने …….. साली 'सब – सहारन आफ्रिकेतील' चिरस्थायी विकासाच्या अहवालामध्ये सुशासन या संकल्पनेचा उल्लेख केला.

अ) १९७९ ब) १९८९ क) १९६९ ड) १९९०

२. १९९२ साली प्रकाशित झालेल्या जागतिक बँकेच्या (शासन आणि विकास) अहवालानुसार सुशासनाचे …….. निकष स्पष्ट होतात.

अ) दोन ब) चार क) पाच ड) तीन

३. सुशासन संदर्भात ''आम्हास सामर्थ्यवान शासन संस्थेची गरज नाही. आम्हाला चांगल्या शासन संस्थेची गरज आहे''. असे वक्तव्य कोणी केले आहे.

अ) पै. पानंदीकर ब) डेव्हिड ओसबर्बान क) डेव्हिड ईस्टन ड) मॅक्स वेबर

४. माहितीचा अधिकार कायदा' केंद्र सरकारने …… रोजी मंजूर केला.

अ) १२ ऑक्टोंबर २००५ ब) १६ ऑक्टोंबर २००५

क) १६ ऑक्टोंबर २००६ ड) १२ ऑक्टोंबर २००६

५. 'सुशासन' या संकल्पनेचा उदय …….. साली झाला.

अ) १९९२ ब) १९९५ क) १९९० ड) २००२

६. केंद्रीय अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी ……… साली घटकराज्य पातळीवर करण्यात आली.

अ) २०१४ ब) २०१३ क) २०१५ ड) २०१२

७. एक खिडकी योजनाचा अंमल ……… राज्यात सुरु करण्यात आला.

अ) महाराष्ट्र ब) आंध्र प्रदेश क) केरळ ड) चंदीगड

८. उत्तरदायित्व, जबाबदारी आणि पारदर्शीपणा ही तीन महत्त्वाची वैशिष्टे …… या संकल्पनेत आढळतात.

अ) खासगी प्रशासन ब) प्रशासन क) सुशासन ड) यापैकी एकही नाही

९. सुशासनाच्या व्यापक अंमलबजावणीसाठी ……… ही बाब महत्वाची ठरते.

अ) लोकशाही केंद्रीकरण ब) उदारीकरण

क) खाजगीकरण ड) लोकशाही विकेंद्रीकरण

१०. केंद्रीय माहिती अधिकार २००५ मध्ये ……… कलमानुसार प्रत्येक घटक राज्यात 'राज्य माहिती आयोग' स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

अ) १५ ब) १४ क) १६ ड) १३

११. केंद्राने १९९८ साली ……….. घटकासाठी ई – गव्हर्नन्सची मोहिम सुरु केली.

अ) सैन्य ब) लष्कर क) शिक्षण ड) आरोग्य

१२. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान याचा सुरवातीचा कालावधी ………. वर्षाचा होता.

अ) पाच (२००५–२०१०) ब) सहा (२००६ –२०१२)

क) पाच (२००५–२०१२) ड) सहा (२००५– २०१३)

१३. 'शासन ज्ञान केंद्र' (GKC) या वेब पोर्टलची स्थापना ……. साली झाली.

अ) २००६ ब) २००५ क) २००७ ड) २०१०

१४. अन्न सुरक्षा कायदा २०१३ नुसार प्रतिव्यक्तीस ......... धान्य देण्याची सोय करण्यात आली.

अ) ६ किलो ब) ४ किलो क) ३ किलो ड) ५ किलो

१५. लोकशाही विकेंद्रीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी ........ हा घटनादुरुस्ती कायदा १९९२ साली मंजूर करण्यात आला.

अ) ४२ ब) ४४ क) ७३ ड) ९२

१६. भारतात सुशासनाची सुरुवात ........ पंचवार्षिक योजनेनुसार झाली.

अ) दहाव्या ब) नवव्या क) बाराव्या ड) सातव्या

१७. देशातील .......... टक्के जनतेला अन्न सुरक्षा कायद्याचा लाभ मिळणार आहे.

अ) एक तृतीयांश ब) दोन तृतीयांश क) एक चतुर्थांश ड) तीन चतुर्थांश

१८. सुशासनाच्या संकल्पनेत ......... हा घटक मध्यवर्ती असतो.

अ) संस्था ब) सरकार क) नोकरशाही ड) नागरिक

१९. माहिति अधिकारार्तंग सरकारी कर्मचाऱ्यांनी .......... दिवसाच्या आत सरकारी दस्ताऐवजाची माहिती सामान्य नागरिकास देणे आवश्यक असते.

अ) ४२ ब) ३० क) ४५ ड) ९०

२०. सुशासन ही संकल्पना स्पष्ट करताना 'लोकांचे जीवन शांततापूर्ण, शिस्तबध्द, प्रगतीशील व सहभाग दर्शविणारे आहे' ही व्याख्या कोणी केली आहे.

अ) पै. पानंदीकर ब) डेव्हिड ओसर्बान क) डेव्हिड ईस्टन ड) मॅक्स वेबर

२१. सुशासनात न्याय्य व ........ अशी कायद्याची चौकट असणे गरजेचे असते.

अ) प्रबळ ब) व्यवहार्य क) कृतीशील ड) निष्पक्ष

२२. भारत सरकारने ........... रोजी राष्ट्रीय ई – शासन योजना मंजूर केली.

अ) १८ मे २००८ ब) १६ मे २००६

क) १८ जून २००६ ड) १८ मे २००६

२३. सुशासनास ......... असे प्रशासन ही संबोधले जाते.

अ) Active ब) Simple क) Responsive ड) Smart

२४. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना (२००५) अंतर्गत ....... सेवा उपलब्ध करुन देण्याचा उदेद्श होता.

अ) स्वच्छता मोहिम ब) जननी सुरक्षा

क) प्राथमिक आरोग्य सुविधा ड) कुपोषण मुक्त मोहिम

२५. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा विस्तार ......... पंचवार्षिक योजनेतंर्गत करण्यात आला.

अ) नववी ब) दहावी क) अकरावी ड) बारावी